रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २०७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

रायगड, बुधवार, दि. २५ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

नाताळनिमित्त शुभेच्छा

**आजचा अग्रलेख**
**अस्सल दिग्दर्शक गेला**

## राजकीय पुढाऱ्यांचे बगलबच्चे मालामाल | योजना पूर्ण न होताच बिल ठेकेदाराला अदा

# काम अपूर्ण, बिल पूर्ण ?



| पेण | प्रतिनिधी |

**पेण तालुक्यातील सर्वात मोठी खारबंदिस्तीची योजना म्हणजे नारवेल-बेनवले खारबंदिस्ती योजना. या योजनेचे कार्यरिम आदेश ३० जुलै २०२० रोजी देण्यात आले. ही योजना मे २०२२ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र आजमितीस हे काम पूर्ण झालेले नाही. या योजनेत अधिकाऱ्यांनी आर्थिक हितसंबंध जोपासल्यामुळे ठेकेदारांनी मात्र धमाल केली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.**

या योजनेचा ठेका सोलापूर येथील ठेकेदार प्रथमेश काकडे यांना देण्यात आला होता. सुरूवातीला या योजनेची किंमत ५१ कोटी ७६ लाख २२ हजार ४१० रूपये होती. साधारणतः २०२० मध्ये या योजनेला सुरूवात झाली. सुरूवातीच्या काळापासूनच या योजनेत अनेक राजकीय मंडळींनी हस्तक्षेप करून आपल्या बगलबच्च्यांना कशी कामं मिळतील, यासाठी प्रयत्न केला. काही प्रमाणात शेतकऱ्यांना दमदाटी करण्यासाठी खाकी आणि खादी एकत्र आल्याचे पहायला मिळाले. तसेच या योजनेत काही गावगुंडांनी आपल्या पोळीवर तुप वाढले. पेणचे आमदार आणि अलिबागच्या आमदार या योजनेवरून संघर्षही पेटल्याचे जिल्ह्याने पाहिले.

आज जवळपास साडेचार वर्ष उलटून गेली आहेत. या योजनेबाबत कृषीवलच्या प्रतिनिधींनी खारभूमीच्या कार्यालयात जाऊन माहिती घेतल्यानंतर जी माहिती समोर आली, ती फारच धक्कादायक आहे. १६.४० किलोमीटरच्या योजनेमधील १८० मीटर आणि १५० पान २ वर

**काळेश्री गावालगत असणाऱ्या नारवेल-बेनवले या खारबंदिस्ती योजनेतील ० ते १८० मीटरचा बांध पुर्ण झाला नाही. याबाबत उपअभियंता अतुल नंदन भोईर यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, योजना मार्च २०२४ ला पूर्ण झाली असून ठेकेदाराला योजनेचे पूर्ण बिल ९२ कोटी ८० लाख दिले आहेत. मात्र कृषीवलच्या प्रतिनिधीने काळेश्री येथील ० ते १८० मिटरची खारबंदिस्ती तसेच दिव ग्रामपंचायत हद्दितील अशोक ठाकूर यांच्या घराशेजारी साधारण १४० ते १५० मीटरचा बांध झाला नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर शेतकरी जमीन देत नाहीत म्हणून दोन ठिकाणी खारबंदिस्तीचे काम अपूर्ण राहिले. ते वगळून बिल काढले असल्याचे भोईर यांनी सांगितले.**

## वेधक

### अपघातात एकाचा मृत्यू

**नागोठणे :** नागोठण्याजवळील कोलेटी गावाच्या हद्दीतील मुंबई-गोवा महामार्गावर मोटारसायकलस्वार घसरून पडल्याने झालेल्या अपघातात मोटरसायकल चालक अंश परशुराम कोष्टी (वय १९, रा. महात्मा गांधी नगर, कोपरी, ठाणे) याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत मोटरसायकलच्या मागे बसलेला भरत शंकर जोशी (वय २३, रा. महात्मा गांधी नगर, कोपरी, ठाणे) हा जखमी झाला आहे. हा अपघात सोमवारी (दि.२३) दुपारी १२.४० वाजण्याच्या सुमारास घडला. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, अंश व भरत हे दोघे होंडा पॅशन मोटर पान २ वर

### अल्पवयीन मुलांवर अत्याचार

**पनवेल :** पनवेल भागात राहणाऱ्या एका ११ वर्षीय मुलाने तो राहत असलेल्या इमारतीतील ८ वर्षीय मुलावर तसेच ३ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या ११ वर्षीय अल्पवयीन मुलाविरोधात बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कार्यवाही सुरु केली आहे.या घटनेतील ११ वर्षीय अल्पवयीन मुलगा तसेच ८ वर्षीय पीडित मुलगा व ३ वर्षीय पीडित मुलगी हे तिघेही पनवेलमध्ये एकाच इमारतीत राहण्यास आहेत. त्यामुळे त्यांची एकमेकांसोबत चांगली ओळख असल्यामुळे तिघेही नियमित एकत्र खेळत होते. या अल्पवयीन मुलाने पीडित मुलगा व पान २ वर

### लाच घेताना कनिष्ठ लिपिक जाळ्यात

**पनवेल :** मेरीडाईन ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ३२ ट्रेलर वाहनाचे स्पिड गव्हर्नर प्रमाणपत्र ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता ३२ हजाराची मागणी केल्याप्रकरणी पनवेल आरटीओतील कनिष्ठ लिपीक संदीप संभाजी बासरे यांना सोमवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाच ही समाजाला लागलेली एक कीड आहे. बक्कळ पगार असतानाही शासकीय काम करून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून लाच स्वीकारली जात आहे. त्यात पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय अग्रेसर असल्याचे सोमवारी झालेल्या पान २ वर

## शेतकऱ्यांनी नोंदविल्या हरकती

**शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प उभारा**

| अलिबाग | प्रतिनिधी |

औद्योगिक क्षेत्रासाठी पोहोच रस्ता बनविण्याच्या प्रयोजनसाठी भूसंपादनाच्या निवाड्यासाठी अंतिम रक्कम ठरविण्यापूर्वी बाजू मांडण्याची नोटीस अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी धेरंड-शहापूर येथील शेतकऱ्यांना बजावली. उपविभागीय अधिकाऱ्यांनी बजावलेल्या या नोटीसीवर असंख्य शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत.

दीडशेहून अधिक शेतकरी मंगळवारी उपविभागीय कार्यालयामध्ये एकत्र आले. प्रकल्पाला विरोध नाही, परंतू शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प उभारा. तसेच वेगवेगळ्या विभागांसह शेतकऱ्यांची संयुक्त बैठक लावण्यात यावी अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी केल्या. यावेळी अनिल पाटील, भानुदास पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

शासनाने ११ सप्टेंबर २०१९ रोजी जमिनीच्या भूसंपादनाबाबत औद्योगिक विकास अधिनियम १९९६१च्या कलम ३२(२) नुसान सूचना प्रसिध्द केली. त्यावरील कारवाई पूर्ण झाली नसताना १३ एप्रिल २०२४ रोजी वरील अधिनियमद्वारे कलम ३२ (१) ची सक्तीच्या भूसंपादनाची खासगी भूखंड धारकांच्या पोहोच रस्त्यासाठी पुन्हा अधिसूचना काढणे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य नाही. विस्तारित धेरंड औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादनासाठी ७२ लाख रुपये प्रति एकर दर मान्य नाही. कायद्याने ठरवून दिलेला जीमनीचा मोबदला परिगणित कार्यपध्दती मान्य असेल, तरच इतर मागण्यांसंदर्भात चर्चा केली जाईल. अधिनियम १९६१ कलम ३३ (४) ची नोटीस २७ नोव्हेंबर रोजी दिलेली आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांनी कोणतीही प्रकारची हरकती नोंदविली नाही, असा उल्लेख केला आहे. तो खोटा आहे. याबाबत पान २ वर

### संयुक्त बैठक घ्यावी

**शहापूरमध्ये यापूर्वी मोठा प्रकल्प आणण्याच्या नावाखाली सक्तीने भूसंपादन लादले. आज हजार एकर जमीन पडून आहे. त्यामुळे शहापूर-धेरंड येथे एका प्रकल्पासाठी व तेथील पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच करावे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून त्यांना न्याय द्यावा. संबंधित येणारी कंपनी, एमआयडीसी अधिकारी, जिल्हा प्रशासन व शेतकरी यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी, असे ॲड. कुंदन पाटील यांनी सांगितले.**

> **गेल्या दोन वर्षापासून वारंवार शासनाकडे प्रश्न मांडत आहे. शासनाचे अतिक्रमण सुरु आहे. शासनाकडे अहवाल पाठविण्यात आला असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र अजूनपर्यंत आमचा आवाज शासनापर्यंत पोहचला नसल्याची खंत आहे. विकसीत भूखंड, नोकरी देण्यात यावी. शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यात यावे, अशा अनेक मागण्या आहेत.**
> **- निवृत्ती पाटील, शेतकरी**

## निद्रिस्त प्रशासनाविरूध्द धरणे आंदोलन



| पेण | प्रतिनिधी |

गेली १५ दिवस भोगावती नदीमध्ये झालेल्या उत्खननाबाबत प्रसार माध्यमांनी बातम्या प्रसिध्द करून प्रशासनाला जागं करण्याचा प्रयत्न केला. परंतु गेंडयाच्या कातडीच्या प्रशासनाला काहीच फरक पडला नाही. अखेर निसर्गप्रेमी प्राध्यापक उदय मानकवळे यांनी एक दिवसाचे लाक्षणिक धरणे आंदोलन करण्याची वेळ आली.

आठ दिवसापूर्वी याबाबत प्राध्यापक मानकवळे यांनी तहसिल कार्यालयात निवेदनाद्वारे भोगावती नदीमध्ये चाललेल्या अनधिकृत कामाबद्दल आपले म्हणणे मांडले होते. परंतु याबाबत तहसिल कार्यालयातून कोणतीच दखल घेतली नाही. त्यावेळी प्रा. उदय मानकवळे यांनी नदी वाचविण्यासाठी पान २ वर

> **हे धरणे आंदोलन प्रशासनाला चेतावणी आहे. भोगावती नदी संदर्भात ठोस पावले जर प्रशासनाने उचली नाही तर येत्या काळात आमरण उपोषण केले जाईल. आज पेणची जीवनवाहिनी ही भोगावती नदी आहे. परंतु अतिक्रमण आणि प्रदूषणाने तिला वेढले आहे. हे कुठे तरी थांबणे गरजेचे आहे.**
> **-उदय मानकावळे, उपोषणकर्ते**

> **सिडकोच्या कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. तसेच सिडकोने नदीमध्ये अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. सिडकोविरोधात कायदेशीर कारवाई करणार आहोत. तसेच अतिक्रमणाबाबत आम्ही ब्ल्यू लाईन व रेड लाईन निश्चितीकरण केले आहे. ते मंजूरीसाठी वरिष्ठांकडे पाठवले आहे. परवानगी मिळताच पोलीस यंत्रणेच्या मदतीने आम्ही नदीतील अतिक्रमण हटवणार.**
> **- आकाश ठोंबरे, उपअभियंता, जलसंपदा विभाग**

## शाम बेलेगल यांचं निधन

| मुंबई | प्रतिनिधी |



भारतीय मनोरंजन विश्वातील प्रख्यात सिनेदिग्दर्शक शाम बेलेगल यांचं निधन झालं. मंगळवारी (दि.२४) त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्याम बेनेगल यांच्या निधनाने आशयघन सिनेमांची निर्मिती करणारा एक दिग्दर्शक गमावल्याची भावना प्रत्येक सिनेरसिकाच्या मनात आहे. १४ डिसेंबरलाच श्याम बेनेगल यांनी त्यांचा ९० वा वाढदिवस साजरा केला होता. गेल्या अनेक महिन्यांपासून श्याम बेनेगल गंभीर आजाराशी झुंज देत होते.

श्याम बेनेगल यांना किडनरचा आजार झाला होता. या आजारात शरीरातील किडनी काम करणं हळूहळू कमी करते. शरीर अशक्त होत जातं. या आजारामुळे रक्त शुद्धीकरण होत नाही आणि त्यामुळे शरीरामध्ये वेस्ट जमा होतं. श्याम बेनेगल यांच्या निकटवर्तीयांनी सांगितलं की, या आजारामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून श्याम बेनेगल यांनी काम करणं कमी केलं होतं. त्यांना कायम थकवा, अशक्तपणा आणि भूक लागत नव्हती.

या आजारामुळे श्याम बेनेगल यांच्या वजनात सातत्याने घट होत होती. ते बाहेरचे पदार्थ खाणं टाळायचे. आपल्या प्रकृतीची ते कायम काळजी घ्यायचे. त्यामुळे कामाच्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यात त्यांना त्रास होत होता. त्यांना अनेकदा एलर्जीसारखा त्रास व्हायचा. अशाप्रकारे श्याम बेनेगल गेल्या अनेक काळापासून आजाराशी झुंज देत होते. श्याम बेनेगल यांचे सिनेमे आजही अभ्यासले जातात.

## पत्नीची निर्घृण हत्या

| अलिबाग | प्रतिनिधी |

नवऱ्याने रागाच्या भरात पत्नीची निर्घृण हत्या केली. कुऱ्हाडीने वार करून तिचा खून केल्याची घटना अलिबाग तालुक्यातील वळवली आदिवासी वाडीत मंगळवारी घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजा नाईक ( वय ५० वर्षे) असे या आरोपीचे नाव असून मंदा राजा नाईक असे मयत महिलेचे नाव आहे. दोघेही पती पत्नी असून त्यांच्यामध्ये सतत वेगवेगळ्या कारणांवरून भांडणं होत असतं

मंगळवारी सकाळी दोघांमध्ये भांडण झाले. रागाच्याभरात त्याने तिच्या अंगावर कुऱ्हाडीने वार केले. त्यामध्ये ती महिला गंभीर जखमी होऊन मयत झाली. पान २ वर

**माथेरानमध्ये ई-रिक्षाचा घोटाळा?**

## खरेदी केलेल्या रिक्षांपैकी एक ई-रिक्षा गायब

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरात पर्यावरण पूरक ई-रिक्षा चालविण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ई-रिक्षाचा पायलट प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने सात पर्यावरणपूरक ई-रिक्षा खरेदी केल्या होत्या. सध्या ई-रिक्षाचा दुसरा पायलट प्रकल्प सुरु असून त्यात माथेरानमधील श्रमिक हातरिक्षा चालक हे ई-रिक्षाचालक बनले आहेत. दरम्यान त्यामुळे शासनाने २५ लाख खर्च करून खरेदी केलेल्या सात ई-रिक्षांपैकी दोन ई-रिक्षा माथेरान शहरातून गायब आहेत.मात्र माथेरान पालिकेच्या मालकीची एक ई-रिक्षा नेरळ गावामध्ये प्रवासी व्यवसाय करीत आह. त्यामुळे माथेरान पालिकेच्या रिक्षांची जबाबदारी पालिका मुख्याधिकारी घेणार आहेत काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.



माथेरानमध्ये श्रमिक हातरिक्षा संघटना यांच्याकडून २०१२ पासून न्यायालयीन लढाई लढली जात होती.त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालविण्यास परवानगी दिली होती.अखेर ५ डिसेंबर २०२१ मध्ये तीन महिन्यांचा पायलट प्रकल्प पान २ वर

> **पालिका आवारात असलेल्या दोन ई-रिक्षा पैकी एक ई - रिक्षा दवाखान्यासमोर असून अन्य एक ई-रिक्षा दुरुस्तीच्या कामासाठी खाली पाठवण्यात आली आहे. दुरुस्तीचे काम कधी पूर्ण होणार याची माहिती कार्यालयीन अधीक्षक सदानंद इंगळे यांच्याकडे असून दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर ती ई-रिक्षा पुन्हा माथेरान शहरात येईल आणि पालिका आवारात सुरक्षित राहिल.**
> **- राहुल इंगळे,मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद**

## नाताळ निमित्त रोषणाईसह सजावटीची तयारी

# जिंगल बेल, जिंगल ऑल द वे...



**डैशिंग थ्रू द स्नो...इन अ वन हॉर्स ओपन स्लै...ओवर द फील्ड्स वी गो...लाफिंग आल द वे...बेल्स ओन बोब टेल्स रिंग...मेकिंग स्पिरिट्स ब्राइट...व्हाट फन ईट इज़ टू राइड एंड एंड सिंग...अ स्लेईग सोंग टू नाइट...हो...जिंगल बेल्स जिंगल बेल्स...जिंगल आल द वे... ख्रिसमस म्हटलं की आपल्या कानात वाजू लागते, जिंगल बेल अन् समोर दिसतो लाल कपड्यातला सांताक्लॉज.. त्याच्या अंगावर लाल रंगाचे कपडे, पांढरी शुभ्र दाढी आणि गोंड्यांची टोपी असते. नाताळची उत्कंठा असते ती लहान मुलांमध्ये सांता बाबा येईल आणि काहीतरी गिफ्ट देऊन जाईल. यामुळे नाताळबाबाची वाट पाहत झोपणाऱ्या चिमुकल्यांबरोबरच हा सण ख्रिश्चन बांधवांसाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. हा सण संपूर्ण देशभरात साजरा करण्यात येतो.**



● (छायाचित्र : समीर मालोदे)

| अलिबाग | प्रतिनिधी |

अध्यात्म,भक्ती, श्रध्देसोबतच आनंद व जल्लोष घेऊन येणारा ख्रिस्त समाजातील नाताळ पवित्र सण म्हणून ओळखला जातो. प्रभू येशुंचा जन्म दिवस म्हणून या दिवशी जल्लोष साजरा केला जातो. नाताळ निमित्त बाजारात सांताक्लॉजचे लहान मोठे बाहुले,टोप्या, क्रिसमस ट्री अशा अनेक वस्तूंनी जिल्ह्यातील बाजारपेठा सजल्या आहेत. पान २ वर

## पत्नीची हत्या करून फरार आरोपी ३३ वर्षांनी अटकेत

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

पत्नीची हत्या करून ३३ वर्षे फरार असलेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. बाबू गुडगीराम काळे असे आरोपीचे नाव आहे.

२८ जानेवारी १९९१ रोजी बाबू काळे यांनी पत्नीला किरकोळ भांडणावरून तिच्या अंगावर रॉकेल ओतून जाळण्याचा प्रयत्न केला. तिला सायन हॉस्पिटल येथे दाखल केले असता महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाला. त्यानंतर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपी तेथून फरार होऊन स्वतःचे अस्तित्व लपवत असल्याने त्याच्या विरोधात दोषारोपपत्र न्यायालयामध्ये सादर करण्यात आले. गेली ३३ वर्षे त्याने पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या.

प्रथम वर्ग न्यायालयाचे अटक वॉरंट प्राप्त झाल्याने पोलिसांनी आरोपीची माहिती प्राप्त केली. आरोपी हा मुलुंड येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. पोलीस पथकाच्या सहाय्याने मुलुंड येथे तपास केला असता आरोपी हा सेतू, जिल्हा परभणी येथे असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार सपोनि प्रकाश पवार व पोलिसांचे पथकाने तपास केला असता आरोपीचा मोबाईल नंबर सापडून आला. मोबाईल क्रमांकाच्या तांत्रिक तपासाच्या आधारे बाबू काळे याला ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन जानेवारीपर्यंत कोठडी सुनावली.

पान १ वरून

## काम अपूर्ण, बिल पूर्ण?

मीटर अशा दोन ठिकाणी खारबंदिस्तीचे काम झालेच नाही. असे असतानाच अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला पूर्ण बिल अदा केले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांना जर आपल्या जमिनीचा मोबदला दिला असेल तर ते जमीन खाली का करत नव्हते अथवा जमीन खाली का करून घेतली नाही याविषयी अभियंता भोईर यांनी बोलणे टाळले.

मिळालेल्या माहितीनुसार सर्व शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला आहे. मग १८० मीटर आणि १५० मीटरचे अशा दोन तुकड्यांची बंदिस्ती न होता योजना पूर्ण झालीच कशी? १६.४० किलोमिटरच्या खारबंदिस्तीमधील दोन तुकड्यांची काम न झाल्याने ही योजना अपुऱ्या स्थितीतच आहे. तसेच ही योजना अयशस्वी आहे कारण जर या दोन ठिकाणांतून बंदिस्तीला खांड गेल्यास जवळपास १ हजार ३८८ हेक्टर जमीन नापिक होईल. म्हणजेच शासनाचा जवळपास ९३ कोटी खर्च पाण्यात जाईल. याशिवाय या बंदिस्तीच्या बाजुने वृक्षलागवड होणार होती. परंतु एकही झाड ठेकेदाराकडून लावण्यात आले नाही. कृषीवलच्या प्रतिनिधीने १६ किलोमिटरच्या खारबंदिस्तीची पाहणी केली. त्यांना कुठेही झाडे आढळली नाहीत. तसेच पुढे दिड वर्षासाठी दायित्व कालावधी असून ठेकेदारांनी या बंदिस्तीची देखभालदुरूस्ती करणे बंधनकारक आहे. परंतु १८० मीटर आणि १५० मीटर या दोन तुकड्यांची बंदिस्ती न झाल्याने ही पूर्ण योजना अपयशी ठरत आहे. कारण काळेश्री येथील ० ते १८० मिटरच्या दरम्यात संरक्षण भिंत पाण्यामध्ये सरकली आहे. ती या बंदिस्तीचाच भाग आहे. याचाच अर्थ अधिकाऱ्यांनी बिल काढून कमाल केली ठेकेदारांनी बिल घेऊन धमाल केली तर राजकीय बगलबच्चे लक्ष्मीदर्शनाने मालामाल झाले.

## निद्रिस्त प्रशासनाविरूध्द धरणे आंदोलन

माफक मागण्या केल्या होत्या. भोगावती नदीचे सीमांकन करून पूररेषा निश्चित करा. महाराष्ट्रातील सर्व नद्यांचे सीमांकन करून उगमस्थान ते संगम स्थानापर्यंत पूररेषा दर्शक माहिती फलक लावा. नद्यांवरील पूररेषेच्या आतील अतिक्रमण त्वरीत काढून टाका. गटाराचे पाणी, रासायनिक द्रव्य इतर मानवनिर्मित कचरा, प्लास्टिक नद्यांमध्ये टाकण्यास बंदी करा. महाराष्ट्रातील सर्व नद्यांना झेड सिक्युरिटी द्या. नदी काटावरील जैवविविधतेचे संरक्षण करा. तसेच भोगावती नदीमध्ये चाललेले अतिक्रमण तातडीने थांबवा, अशा मागण्या त्यांनी केल्या होत्या. मात्र याकडे महसुल तसेच जलसंपदा विभागाने दुर्लक्ष केले.

## शेतकऱ्यांनी नोंदविल्या हरकती

५ फेब्रुवारी २०२३ रोजीनंतर ७ मार्च २०२४ रोजी हरकती नोंदविल्या आहेत.त्याच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत. साडेबारा टक्के भुखंड, नोकरी, पुनर्वसनाचे सर्व कायद्यांचे पालन करून न्याय देण्यात यावा. विकासाला विरोध नाही. परंतु शासनाने कायद्याप्रमाणे भूसंपादनाची प्रक्रिया राबविली पाहिजे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ तसेच पुनर्वसन व भूसंपादन कायद्याप्रमाणे जमीन मोजणी प्रक्रिया केली नसल्याने दर निश्चिती करता येत नाही. या सर्व बाबी गांभीर्याने घेऊन नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करून न्याय देण्यात यावा.

राज्य घटनेने दिलेल्या अधिकारांचा वापर करून योग्य त्या कायदेशीर व न्यायालयीन मार्गाचा अवलंब करून सक्तीच्या भूसंपादनाला विरोध करावा लागेल. प्रकल्पाच्या पोहच रस्त्याच्या मोजणीबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अंतिम निकाल येईपर्यंत कोणत्याही प्रकारची शासकीय कार्यवाही करू नये, अशी मागणीदेखील या हरकतीनुसार करण्यात आली आहे. याबाबत प्रभारी उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड यांच्याकडे निवेदन देऊन असंख्य शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत.

## खरेदी केलेल्या रिक्षांपैकी एक ई-रिक्षा गायब

शासनाने हाती घेतला. त्यासाठी रायगड जिल्हाधिकारी यांनी सात ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी माथेरान नगरपरिषदेला २५ लाखांचा निधी मंजूर केला होता. हा पायलट प्रकल्प ४ मार्च रोजी संपला आणि त्यानंतर त्या सात ई-रिक्षा माथेरान मधील नगरपरिषदेच्यासमोर गोडाऊनमध्ये जाऊन पडल्या.त्यानंतर बरोबर आठ महिन्यांनी न्यायालयीन लढाई जिंकण्यात यशस्वी झाल्यानंतर २६ डिसेंबर रोजी माथेरान शहरात राज्य सरकारकडून दुसरा पायलट प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. त्यात हातरिक्षा वाहणाऱ्या २० रिक्षा चालकांना पर्यावरणपूरक ई-रिक्षाचे स्टिअरिंग हाती दिले. हा पायलट प्रकल्प हातरिक्षा चालक यांच्या माध्यमातून चालविला जात असल्याने माथेरान शहरात शासनाने खरेदी केलेल्या सात ई-रिक्षा भंगारात गेल्यासारख्या पालिकेच्या समोर उभ्या होत्या.

मात्र त्या सात ई-रिक्षा पैकी काही ई-रिक्षा या माथेरान पालिकेच्या आवारात दिसून येत नाहीत. मागील दोन तीन महिन्यात शासनाने खरेदी केलेल्या ई-रिक्षा गायब आहेत. त्याबाबत पालिकेत विचारणारा केली असता दुरुस्तीच्या कामासाठी पनवेल येथे पाठवण्यात आल्या असल्याचे उत्तर देण्यात येत आहे. मात्र त्या ई-रिक्षा यांच्या माध्यमातून कोणताही प्रवास माथेरान शहरात मागील ११ महिना झालेला नाही आणि तरी देखील दुरुस्तीचे काम करण्यासाठी त्या ई-रिक्षा शहराच्या बाहेर पाठवण्यात आल्या आहेत. मात्र त्यातील एक ई-रिक्षाचे स्टिअरिंग जाम झाले असून ती ई-रिक्षा पालिका आवारातच आहे असा पालिकेचा दावा आहे.परंतु ती ई-रिक्षा दवाखान्यासमोर अनेक दिवस दिसून आलेली नाही आणि त्यामुळे त्या ई-रिक्षांचे गौडबंगाल समजून येत नसल्याने पालिकेच्या कारभाराबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मागील सहा महिने एका जागेवर उभ्या असलेलया ई-रिक्षा कशामुळे नादुरुस्त झाल्या हा प्रश्न असून त्या सात पैकी दोन ई-रिक्षा कुठे गेल्या आहेत? हा प्रश्न सर्वांना पडला आहे. त्या ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी शासनाने माथेरान पालिकेला २५ लाखाचा निधी तत्कालीन मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या कार्यकाळात देण्यात आला होता.

माथेरान पालिकेच्या आवारात शासनाच्या मालकीच्या सात ई-रिक्षा आज माथेरान पालिकेच्या आवारात दिसून येत नाही.पालिकेने १० जून पासून प्रवासी वाहतूक किंवा कोणत्याही वापराविना बंद असलेल्या सात पैकी दोन ई-रिक्षा या माथेरान पालिकेच्या आवारात ठेवल्या होत्या. तर अन्य पाच ई-रिक्षा या माथेरान पालिकेच्या कम्युनिटी सेंटरमध्ये ठेवल्या होत्या.त्या पाच ई-रिक्षा कम्युनिटी सेंटरमध्ये आजही आहेत. मात्र माथेरान पालिका कार्यालयाच्या समोर असलेल्या ई-रिक्षा या गेल्या दोन महिन्यापासून तेथे दिसून येत नाही. त्या दोन ई-रिक्षांबाबत माथेरान पालिकेत चौकशी केली असता त्या दोन ई-रिक्षा पनवेल येथे दुरुस्तीसाठी गेल्या असल्याची माहिती देण्यात येत आहे. मात्र त्या ई-रिक्षांचा मागोवा घेतला असता त्यातील एक ई-रिक्षा नेरळ गावात प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय करीत असल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे पालिका त्या दोन ई-रिक्षा माथेरान बाहेर दुरुस्तीच्या कामासाठी नेण्यात आल्या आहेत ही माहिती चुकीची आहे.त्याचवेळी माथेरान पालिकेचे मालकीच्या त्या ई-रिक्षा पैकी एक ई-रिक्षा खासगी व्यक्तीचे हाती कशी? असा प्रश्न देखील समोर येत आहे.

नेरळ गावात आर ४ या क्रमांकाची ई-रिक्षा फिरत असून त्याबद्दल रायगड जिल्हाधिकारी माथेरान पालिकेला जाब विचारणार आहेत काय? असा प्रश्न माथेरानमधील जनतेच्या मनात आहे.त्याचवेळी दुसरी ई-रिक्षा नक्की कुठे आहे. याबद्दल देखील रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.त्याचवेळी ज्या पाच ई-रिक्षा कम्युनिटी सेंटरमध्ये उभ्या आहेत. त्यांचे काय करायचे यावरदेखील रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून निर्णय व्हावा, अशी मागणी केली जात आहे.

## पत्नीची निर्घृण हत्या

या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी, रेवदंड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, पोलीस उपनिरीक्षक नंदगावे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. ठार मारण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. परंतु संशयावरून खून केल्याचा अंदाज प्राथमिक चर्चेतून असल्याचे सांगण्यात आले आहे.

## जिंगल बेल जिंगल ऑल द वे...

बुधवारी (दि.२५) नाताळच्या पार्श्वभूमीवर चर्च, घरे, वाड्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची सजावट करण्यात आली आहे. त्याची लगबग ठिकठिकाणी दिसून आली आहे.

डिसेंबर महिना उजाडल्यानंतर अनेकांना नाताळसह सरत्या वर्षाला निरोप देण्याची चाहूल लागते. रायगड जिल्ह्यामध्ये अलिबागसह अनेक तालुक्यांमध्ये विशेष म्हणजे मुरूड तालुक्यात ख्रिस्ती समाज आहे. सध्या जिल्ह्यामध्ये नाताळ सणाची तयारी जोरात सुरु आहे. ही तयारी अंतिम टप्प्यात आहे. सजावटीच्या साहित्यांना बाजारपेठा सजल्या आहेत. सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी ग्राहकांची लगबग आहे.

ख्रिस्त जन्माच्या देखाव्यासाठी गोठे, दिव्यांच्या माळा, सांताक्लॉजचे चित्र, बाहुले, टोप्या, प्रभू येशू आणि मेरीच्या मूर्तींना ग्राहकांकडून प्रचंड मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सेंटमेरीसह अनेक शाळांमध्ये सांताक्लॉज आणि सांताक्लॉजचे मुखवटे, ख्रिसमस ट्री खरेदी करून सजावट करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसह शाळेतील शिक्षकांकडून यामध्ये सक्रिय सहभाग दिसून आला आहे. सांताक्लॉजचे पेहराव करण्यावरही भर देण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या चर्चमधील प्रार्थना सभागृहात सजावट करण्यात आली आहे. विद्युत रोषणाईसह वेगवेगळ्या आकाराचे रंगाचे फुले लावण्यात आले आहेत. बुधवारी होणाऱ्या नाताळच्या दिवशी सकाळी प्रार्थना घेतली जाणार आहे. अनेकांना गोड पदार्थ देऊन नाताळच्या शुभेच्छा दिल्या जाणार आहेत. तसेच सायंकाळी वेगवेगळे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## लाच घेताना कनिष्ठ लिपिक जाळ्यात

कारवाईत दिसून आले आहे. मेरीडाईन कंपनीच्या ३२ ट्रेलरचे स्पिड गव्हर्नर प्रमाणपत्र ऑनलाइन नोंदणी करण्याकरिता प्रत्येकी १ हजार रुपये प्रमाणे ३२ गाड्यांचे ३२ हजार रुपयाची मागणी आरटीओतील कनिष्ठ लिपीक संदिप बासरे यांनी केली होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्याकडे तक्रारदाराने रितसर तक्रार दाखल केली होती.

त्या तक्रारीनुसार बासरे पैशाची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले. एसीबीकडून सापळा लावण्याचे ठरले. सोमवारी बासरे यांनी संपूर्ण रक्कम न घेता १५ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीअंती १३ हजार रुपये देण्याचे ठरले. सोमवारी एसीबीच्या अधिकारी यांनी पनवेल आरटीओ कार्यालयात सापळा लावला असता कनिष्ठ लिपीक संदीप बासरे (वय ४५ वर्ष) यांनी रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडले. त्याचबरोबर यासाठी मदतनिस म्हणून खासगीत काम करणारे कल्पेश कडू (वय ३१ वर्ष), कपिल पाटील (वय ४५ वर्ष) या तिघांनाही एसीबीने ताब्यात घेतले. त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**लाच प्रकरणी पनवेल आरटीओ चर्चेत**

लाच मागितल्या प्रकरणी वारंवार होणाऱ्या कारवाईतून पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय चर्चेत आले आहे. २०२३ मध्ये कारवाई झाल्यानंतर लागलीच डिसेंबर २०२४ मध्ये सोमवारी कारवाई झाली आहे. आरटीओ कार्यालय स्थापन झाल्यापासून ही चौथी कारवाई झाली आहे. त्यात सहाय्यक आरटीओ अधिकारी, खासगी मदतनिस, खासगी दलाल, कनिष्ठ लिपीक यांचा समावेश आहे.

## अपघातात एकाचा मृत्यू

सायकलवरून ठाणे बाजूकडे जात असताना मोटरसायकल चालक अंश याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर रस्त्याच्या साईडपट्टीवरून मोटरसायकल घसरल्याने चालक अंश कोष्टी त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर जखमी झालेला भरत जोशी याला पनवेल येथील रुग्णालयात पुढील उपचारासाठी नेण्यात आले. अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## अल्पवयील मुलांवर अत्याचार

मुलगी या दोघांना खेळण्याच्या बहाण्याने इमारतीच्या जिन्याखाली नेऊन त्यांच्यासोबत अश्लील व लैंगिक चाळे केले. त्यानंतर या अल्पवयीन मुलाने दोन्ही पीडितांवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. या प्रकारानंतर घाबरलेल्या दोन्ही पीडित मुलांनी घडल्या प्रकारची माहिती आपल्या आई-वडिलांना दिल्यानंतर त्यांनी आपापल्या मुलांसह पनवेल तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या घटनेतील पीडित मुलांच्या चौकशीत सदर अल्पवयीन मुलगा हा दोन्ही पीडितांना गत सप्टेंबर महिन्यापासून खेळण्याच्या बहाण्याने तसेच चॉकलेट देण्याच्या बहाण्याने इमारतीच्या जिन्याखाली त्यांना नेऊन त्यांच्यासोबत अश्लिल व लैंगिक चाळे करत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार पोलिसांनी या अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे बेलकडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राम हिरु भोजने, यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लीयन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, ताबा, वहिवाट, विकसनाचा हक्क, अदलाबदल, वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर प्रमाणित कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींवरील तथाकथीत हक्क सोडून दिले आहेत आणि मिळकतीवर विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही मालकीहक्क, अधिकार नाही आणि सदरहू मिळकती निर्वेध आहेत असे समजून सदर मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि.रायगड येथील**
**तलाठी सजा बेलवडे बुद्रुक यांचे हद्दीतील -**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २४ | ०-५५-७० | ०३.७५ |

अलिबाग
दिनांक :- २४-१२-२०२४

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
पत्ता :- 'गुरुकृपा', महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकचे शेजारी,
मु.पो.ता. अलिबाग, जि.रायगड



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. प्रगती गणेश कुलपे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| १५७५ | ०-०५-६० | ०.११ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २४/१२/२०२४

**ॲड.(डॉ.)दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता.अलिबाग, जि.रायगड.



### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

एम एम आर डी ए
MMRDA

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)- मुंबई ४०००५१.
दुरध्वनी: २६५९४००० • वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

**ई-निविदा मागवणारी सूचना (ग्लोबल टेंडर)**

**कामाचे स्वरूप:** KSC नवनगर शहरासाठी व्हिजन डॉक्युमेंट, सर्वसमावेशक मास्टर प्लॅन, नियोजन प्रस्ताव आणि सविस्तर विकास धोरण तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती.

| अ. क्र. | निविदा प्रस्ताव डाउनलोड करण्याचा कालावधी | | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| | तारीख / वेळ (पासून) | तारीख/वेळ (पर्यंत) | |
| १ | १५.०१.२०२५ (दुपारी ०३:०० वा) | १३.०२.२०२५ (सायंकाळी ५:०० वा) | १३.०२.२०२५ (सायंकाळी ५:०० वा) |
| | विनंती प्रस्ताव पूर्व बैठक : २२.०१.२०२५ दुपारी ०३:०० वा - ४ था मजला, समिती कक्ष, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण नवीन इमारत, वांद्रा कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ + विडिओ कॉन्फरेन्स द्वारा | | |

**टिप:-** टिप: ई- निविदा प्रस्ताव, **https://mahatenders.gov.in/nicgep/app** या संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येतील. ई- विनंती प्रस्तावासंबंधीत सविस्तर माहिती, शुध्दीपत्रक आणि मदतीसाठी support-eproc@nic.in या ई-मेल किंवा दूरध्वनी क्र. ०२२-२६५९७४४५ वर संपर्क साधावा.

तसेच सदर प्रस्तावाबाबतच्या अधिक माहितीकरिता आवश्यकता असल्यास, **श्री. मिलिंद भा. पाटील, प्रमुख नियोजन विभाग यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२२-२६५९४०७७ / ०२२२६५९४०६५** येथे संपर्क साधावा. ई-मेल: **kscnt@mailmmrda.maharashtra.gov.in** वर संपर्क साधावा.

**दिनांक :- २४.१२.२०२४**
**ठिकाण :- वांद्रे (पूर्व), मुंबई.**
**क्र.: मुं.म.प्र.वि.प्रा./ नि वि/ NTDA/RFP/2025**

सही/-
**अतिरिक्त महानगर आयुक्त – १ व**
**प्रकल्प संचालक, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण**



### जाहीर नोटीस
**अलिबाग येथील मे. सि. ज. सि. डि. कोर्टात,**

स्पेशल मुकदमा ०६/२०१८,

श्रीमती मालती हातणकर वगैरे, वादी
विरूध्द
श्री. विठ्ठल हातणकर वगैरे, प्रतिवादी

सदर दावा श्रीमती मालती मधुकर हातणकर यांनी विठ्ठल रावजी हातणकर वगैरे विरूद्ध दाखल केला असून, सदर दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ३ संध्या जनार्दन गिजम यांचा 'दिवाणी मृत्यू' झाला असून त्यांना विठ्ठल आणि वंदिता हे वारस असल्याबद्दल ठराव होणेकरिता व जिल्हा रायगड तालुका अलियाग पैकी नगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर ११७अ हिस्सा नंबर १+३/अ२ (१), (नवीन सर्व्हे नंबर १७/४) क्षेत्र ०-५-७ आर्स ही आणि सिटी सर्व्हे नंबर ७४५, ७४५के आणि ७४५/१ या मिळकतीबद्दल व या मिळकतींमध्ये असणाऱ्या अलिबाग नगरपालिका घर क्रमांक १५९१ या घर मिळकती व विहीर इ. बद्दल तसेच जिल्हा रायगड तालुका अलिबाग पैकी मौजे गोंधळपाडा येथील गट नंबर २४ क्षेत्र ०-३९-७ आर्स आकार ५ रूपये २५ पैसे या शेतजमीन मिळकतीबद्दल सदर दाव्यातील प्रतिवादी कमांक २ व ३ यांनी करून दिलेल्या हक्कसोडपत्राबद्दलचे ठरावाकरिता व या मिळकतीमध्ये यादी यांचा निम्मा हिस्सा असल्याचे जाहीर करून सदर हिस्सा पृथक करून ताब्यात मिळणेकरिता व इतर अनुषंगिक मागण्यांकरिता दाखल केला आहे.

तरी सदर सूचनेद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येत आहे की, वर नमूद मिळकतीसंदर्भात दाव्यात नमूद व्यक्तीखेरीज अन्य कोणाचा काही हक्क, हिस्सा असल्यास दाव्यांतील प्रतिवादी क्रमांक ३ कु. संध्या जनार्दन गिजम हयात असल्याचे कथन असल्यास त्याबद्दल योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात तारीख ०१/०२/२०२५ रोजी सकाळी अकरा वाजता हजर राहावे.

येणेप्रमाणे पुरावा न्यायालयासमोर न आल्यास उपलब्ध पुराव्यांचे आधारे दाव्यात नमूद मागण्यांकरिता योग्य तो आदेश केला जाईल.

आज तारीख २३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

**कनिष्ठ लिपिक,**
**दिवाणी न्यायालय**
**अलिबाग-रायगड.**

कोर्टचा शिक्का

**अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय,**
**अलिबाग-रायगड.**



### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसीलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज १४/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. सुलभा गजानन महाळुंगे (पुर्वाश्रमीची) अर्जदार
सौ.अस्मिता अशोक एरंडे
मु.पो. हमरापूर
ता.पेण, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत आवास,
ता.अलिबाग, जि. रायगड सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार श्रीम. सुलभा गजानन महाळुंगे यांचा जन्म दि. ०१-०६-१९६८ रोजी राहत्या घरी मौजे रांजणपाडा, पो.आवास, ता.अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.
२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आवास कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.
३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत आवास येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत बोरघर यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७-०१-२०२५ रोजी पर्यंत मे. तहसीलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०-१२-२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.
ठिकाण अलिबाग
तारीख :- १०-१२-२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसीलदार अलिबाग



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या बागायत मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तसेच खाली नमूद मिळकतींकरीता त्या मिळकतींचे विद्यमान मालक व नियोजीत खरेदीदार यांचेकरीता नागाव भूमापन क्रमांक ३२३ या मिळकतीमधून रस्त्याच्या निरंतर वहिवाटीचा हक्क नोंदणीकृत दस्ताने उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकांचे नाव | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| प्रियांका पराग ठाकूर<br>पुनम पराग ठाकूर | ३१९ | ०-०६-६० | २-९८ |
| शैलेश जयवंत ठाकूर<br>शुभदा भास्कर बगाडे | ३२० | ०-०७-३० | ३-२८ |

येणप्रमाणे वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला जारी करण्यात येईल आणि आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक- २५/१२/२०२४

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
गुरूकृपा, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग,जि.रायगड



### दी कुणबी सहकारी बँक लि., मुंबई
कुणबी ज्ञाती गृह, ३ रा मजला, सेन्ट. झेविअर स्ट्रीट, परेल,
मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी क्र. : ०२०-२४४३३३३५

**ताबा सूचना**
**(नियम ८(१)अंतर्गत)**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी,
अधोहस्ताक्षरित **दी कुणबी सहकारी बँक लि., मुंबई** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर कायदा) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३(१२) सह-वाचन नियम ९ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार **श्री. जितेश गोविंद बामणे व सह-कर्जदार** व त्यांच्या सर्व हमीदारांना सूचनेत निर्देशित रक्कम **रु. १०,४५,९५६/- (रु. दहा लाख पंचेचाळीस हजार नऊशे छप्पन मात्र)** अधिक दि. ०१.०६.२०२४ पासूनच्या व्याजासहित गृहकर्ज सुविधेतील व्यक्तींकरिता रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या प्राप्तीपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी सूचना दि. २८.०६.२०२३ रोजी जारी केली होती.
कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत सहवाचन सदर नियम ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. ३१.०७.२०२४ रोजी माननीय जिल्हा दंडाधिकारी, रायगड अलीबाग द्वारे जारी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**
विशेषतः कर्जदार, हमीदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे **दी कुणबी सहकारी बँक लि., मुंबई** शाखेच्या प्रभारांतर्गत **रक्कम रु. १२,०७,९८८/- (रु. बारा लाख सात हजार नऊशे अठ्याऐंशी मात्र)** सहित दि. २४.१२.२०२४ पासूनचे पुढील व्याज व संपूर्ण रकमे परत करण्याकरिता पुनर्प्राप्ती शुल्क आदी रकमेच्या अधीन असतील.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**
**सर्व भाग व भूखंड स्थावर मालमत्ता धारक :**
**फ्लॅट क्र. ०२, (चटई क्षेत्र १७.७० चौ.मीटर), तळमजला, बी विंग, बालाजी अर्केड, फेज-१,**
**गट क्र. ४६/१, गाव उसर्ली खुर्द, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२२१.**
**सीमा :**
**उत्तर दिशेस : सर्व्हे क्र. ४६/२(३)**
**दक्षिण दिशेस : सर्व्हे क्र. ४७**
**पूर्व दिशेस : मोकळ्या जागेच्या दिशेने**
**पश्चिम दिशेस : ९ मीटर रस्त्याच्या दिशेने**

**तारीख : २३.१२.२०२४**
**ठिकाण : पनवेल, रायगड**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दी कुणबी सहकारी बँक लि., मुंबई करिता**



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड च्या वतीने, वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी द्वारे पुढील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव: एईएन/रत्नागिरी विभागांतर्गत गार्ड रेलचे ओव्हरहॉलिंग. निविदा क्रमांक:केआर-आरएन-डब्ल्यू-2024-43ए (दुसरा कॉल), दिनांक: 23.12.2024. अंदाजे खर्च**: रु. 13,44,011/-. **ईएमडी**: रु. 26,900/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 15.01.2025, 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोले, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. (वेबसाईट: **https://www.ireps.gov.in**).



Ow NO. 2902 /2024
Public Trusts Registration
Office, Raigad
Address: Public Trust Registration
Office, Raigad, Kalpataru Building.
Near Main Post Office, Alibaug.
Raigad Raigarh, Raigarh, Raigarh
Dt: 19/12/2024

**Public Notice**

**Service Request Number:** RGD/14724/18/24
**Inquiry/case No.:** 464/24
**Name of the Trust:** BHOOMI WELFARE TRUST
**Address of the Trust:** Bhoomi Tower, Plot No. 35, 36, 37, And 36A,, Sector 36 Kamothe, Kharghar, Raighar, Maharashtra, Raighar Raigarh, Raigarh, Raigarh
Registration Number of the Trust (if): BHOOMI WELFARE TRUST
**Name of the Applicant:** MR. VILAS DADA KALANGE
**To**
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region.
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Nil | 1000.00 |

Value of Movable Property : Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

Immovable Property

| SRNO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property: Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 19/12/2024

**Sd/-**
**(I/c Superintendent )**
**Public Trusts registration Office,**
**Raigad**



अर्जदारतर्फे ॲड. एस.जी.जोशी

**जाहीर नोटीस** नि.८/ड
**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर साो. यांचे कोर्टात**
दि.चौ.अर्ज क्र. /२०२४

१) श्रीमती संध्या आनंद जोशी,
वय ४८ वर्षे, व्यवसाय-शेती,
२) कु. सोनल आनंद जोशी,
वय २४ वर्षे, व्यवसाय- शेती,
३) अभिषेक आनंद जोशी अर्जदार
वय १९ वर्षे, व्यवसाय शेती,
रा. भवानी पाखाडी नांदगाव,
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला
सर्व जनतेस कळविणेंत येत की,

अर्जदार नं. १ हिचे पती आनंद प्रभाकर जोशी दि. २६ नोव्हेंबर २०२० रोजी मौजे नांदगाव येथे मयत झाले आहेत. त्याचे पश्चात अर्जदार नंबर १ ते ३ हेच त्यांना कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. के. आनंद प्रभाकर जोशी यांची अर्जदार नंबर एक ही पत्नी, नंबर दोन व तीन ही मुले आहेत.

| वाहन प्रकार | कंपनीचे नाव | रजि. नंबर | बनविल्याचे वर्ष व महिना |
|---|---|---|---|
| ॲक्टीव्हा स्कूटर | होंडा मोटर सायकल व स्कूटर | एम एच ०६ बी.एन.५९३६ | ०९/२०१५ |
| मारुती वॅगनआर कार | मारुती सुझूकी | एम एच. ०६ ए एस ४७६७ | ०९/२००८ |

वर नमूद वाहने अर्जदार यांस त्यांचे नावे करुन घेणेची आहे. त्याकरिता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी याबाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे. न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १८-१२-२०२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर**

**सही/-**
**प्र. सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर**

# उरण शहरात कचऱ्याचे ढिग



**। उरण । वार्ताहर ।**

उरण नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे शहरातील कचऱ्याच्या समस्येकडे ठेकेदाराबरोबर असलेल्या आर्थिक हितसंबंधांमुळे दुर्लक्ष होत असल्याने अनेक भागात कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत.

उरण शहरातील कचरा गोळा करण्याचा कोट्यवधी रुपयांचा ठेका दिला आहे. परंतु, ठेकेदाराकडून मुख्य रस्त्यावरील कचरा उचलून मैदानावरील कचराचा साठा तसाच ठेवला जात आहे. याबाबत मुख्याधिकारी समीर जाधव व आरोग्य निरीक्षक हरेश तेजी यांच्याकडे वारंवार तक्रारी करून ही परिस्थिती जैसे थेच आहे. तसेच, कचरा गोळा करणारी गाडी कधी पण येत असल्याने दुकानदार आपला कचरा रस्त्यावर किंवा अडगळीत

**■ जनतेचे आरोग्य धोक्यात**

टाकून मोकळे होतात. त्याचबरोबर कचरा गोळा करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीच उपकरणे प्रामुख्याने हॅन्डग्लोज, गमबुट, मास्क न लावता काम करीत असल्याचे चित्र सर्रासपणे पहावयास मिळत आहे. ठेकेदार नगरपालिका अधिकारी वर्गांशी साटेलोट करून आपले बिल काढीत आहेत. त्यामुळे शहरातील जनतेचे व कचरा गोळा करणारे कामगार वर्ग यांचे आरोग्य धोक्यात येऊन त्यांना आजाराने ग्रासले आहे. याबाबत वरिष्ठांनी यांची नोंद घेऊन ठोस कारवाई करण्याची मागणी शहरातील जनतेकडून केली जात आहे.

# पं.स.च्या आवारात घाणीचे साम्राज्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग पंचायत समितीच्या इमारतीमध्ये मागील काही महिन्यापुर्वी लिफ्टसाठी राखीव असलेल्या जागेत कचरा टाकण्यात आला होता. हा प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊन अनेक महिने उलटली असतानाच याच कार्यालयाच्या आवारात गवत व इतर कचऱ्याने विळखा घातला असून सांडपाण्याचे नियोजन नसल्याने त्याची दुर्गंधी पसरत आहे. कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.



अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी अद्ययावत अशी पंचायत समितीची दुमजली इमारत आहे. या इमारतीमध्ये पंचायत समितीचे कार्यालयात असून बांधकाम विभाग, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाचे कार्यालय आहे. या कार्यालयांमध्ये मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांसह कामामनिमित्त येणाऱ्या नागरिकांची कायमच वर्दळ आहे. या कार्यालयामार्फत गावपातळीवर स्वच्छता राखण्याच्या सुचना कायमच दिल्या जात असतात. परंतु, दुसऱ्या शिकवे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण अशी परिस्थीत अलिबाग पंचायत समितीची झाली आहे.

तसेच, तळ मजल्यावर असलेल्या वेगवेगळ्या कार्यालयांना गळती लागली आहे. तळमजल्यावर वरच्या मजल्यावरील स्वच्छता गृहाचे सांडपाणी भिंतीमधून गळत आहे. शिक्षण विभागाच्या लेखाधिकारी व लेखापरिक्षण पथक कार्यालय आहे. या कार्यालयाच्या बाजूलाच सांडपाण्याचा वास प्रचंड येत आहे. त्याचठिकाणी प्लास्टीक बाटल्या व इतर कचरा व गवत तसेच काटेरी झुडपांनी विळखा घातला आहे. या कार्यालयाच्या आवारात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असताना पंचायत समितीकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याकडे पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष दयावे, अशी मागणी होत आहे.

# नदी-नाले बनले कचराभूमी



**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील सर्वात मोठ्या लोकसंख्येने असणाऱ्या बोर्लीपंचतन ग्रामपंचायतकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडची सोय नाही. त्यामुळे येथील रहदारीच्या रस्त्यांसह नदीनाले कचराभूमी बनले आहेत. या अस्वच्छतेमुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे.

बोर्लीपंचतन गावाजवळ असलेल्या नदी पात्रात व परिसरात स्थानिक गेल्या अनेक वर्षांपासून कचरा टाकत आहेत. या परिसराला कचराभूमीचे स्वरूप आले आहे. स्वछतेचा संदेश देणाऱ्या ग्रामपंचायतचे या कचऱ्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते आहे. विशेष म्हणजे कचरा टाकणाऱ्याला कारवाईची भीतीच नसल्याने येथे कचरा टाकला जात आहे. तसेच, ग्रामपंचायतीमार्फत घंटा गाडी आहे. मात्र, एका गाडीवरती संपूर्ण शहरातील कचऱ्याचा बोझा असल्याने गाडी निघून गेल्यावर स्थानिक व व्यावसायिकांकडून प्लास्टिकसह सुका व ओला कचरा थेट नदीपात्र परिसरात टाकला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकार राजरोस सुरू असून या कचराभूमीमुळे नदीला मोठा धोका पोहोचत आहे.

तसेच, कचरा नदीपात्रात टाकल्यामुळे पावसाळ्यात नदीचे पाणी वाढले की, तो नदीच्या प्रवाहसह नदीच्या पाण्यात वाहून सर्वत्र पसरत आहे. त्यामुळे नदीचे पाणीच नव्हे तर नदी काठावर दोन्ही बाजूला असलेल्या शेतीवर त्याचा परिणाम जाणवत आहे.

# आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा संपन्न




**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था कोकण एज्युकेशन सोसायटीच्या पनवेल विद्या संकुलात २० व २१ डिसेंबर रोजी वाक् स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे कोकण एज्युकेशन सोसायटीचे ध्येय असून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ज्ञानग्रहणाबरोबरच वक्तृत्व, गीत गायन, निबंध, हस्तार्क्ष, टाचन वही व चित्रकला अशा वैविध्यपूर्ण स्पर्धांमधून व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी सोसायटी सातत्याने प्रयत्नशील असते. या वर्षापासून नृत्य स्पर्धा व बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आल्या असून संस्थेमार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या विकास अंकाच्या ‘मुखपृष्ठ सजावट’ स्पर्धा घेण्यात आली.

संस्थेच्या सर्व शाखांमधील गुणवंत व प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा वार्षिक गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.२१) पनवेलमधील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलात संस्थेचे अध्यक्ष सिद्धार्थ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ संजय पाटील, कार्यवाह ॲड. पल्लवी पाटील, ज्येष्ठ संचालक संजय पाटील, संस्थेचे संचालक मंडळ व सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी, शाळा समितीचे चेअरमन मा.आ. बाळाराम पाटील यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत मुख्याध्यापिका वैशाली गावित, संकुलातील सर्व मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथांग परिश्रमातून कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडल्या बद्दल कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले आहे. त्याचप्रमाणे उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, मान्यवरांच्या हस्ते गीत गायन स्पर्धेतील चारही गटातील विजेत्या स्पर्धकांना गौरविण्यात आले. तसेच बुद्धीबळ स्पर्धा, संस्थेतून दहावी आणि बारावी च्या परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले.

# बंदरात गाळ प्रवाशांचे हाल

**। चाणजे । वार्ताहर ।**

उरण मोरा-मुंबई जलवाहतूक सेवा ही स्वातंत्र्य पूर्व काळापासून आजपर्यंत सातत्याने अविरत सुरू आहे. कारण या जलवाहतूक मार्गाने लोकांना मुंबईला जाणे कमी खर्चात जलद सोयीचे होत आहे. या जलवाहतूक मार्गावर प्रवाशांची संख्या खूप मोठी आहे. मात्र, मोरा बंदरातील जेटीजवळ मोठ्या प्रमाणावर गाळ साठला जात असल्याने ओहोटीच्या वेळी प्रवासी बोटींना जेटी जवळ येता येत नाही. यामुळे ही जलवाहतूक सुमारे ५ ते ६ तास बंद ठेवावी लागते. यानंतर भरतीला सुरवात झाली की पूर्ववत जलवाहतूक सुरू केली जाते. मात्र, या नैसर्गिक कारणांमुळे प्रवाशांची मोळी गैरसोय सोय होते.

# पुसाटी स्वप्नातील गाव घोषित



**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील पुसाटी गावाला स्वदेस फाऊंडेशन च्यावतीने स्वप्नातील गाव प्रमाणित करण्याचा कार्यक्रम सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या उपस्थितीत फलकाचे अनावरण करून करण्यात आली.

दरम्यान, स्वदेसच्या मार्गदर्शनामुळे गावातील लोकांनी स्वच्छतेवर भर दिला होता. आरोग्य, स्वच्छता व उपजीविका याविषयी अनेक उपक्रम स्वदेसच्यावतीने गावांमध्ये राबवण्यात आले आहेत. तसेच, शासनाच्या योजनेमधील वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना राबवण्यात आलेल्या आहेत. गावातील महिलांचे नेतृत्व, एकोपा या वैशिष्ट्यांमुळे स्वदेस व शासन यांच्या समन्वयाने पुसाटी हे स्वप्नातील गाव निर्माण झाले आहे. त्याच बरोबर प्रत्येक कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी देखील समिती मार्फत प्रयत्न केले जात आहेत.

स्वप्नातील गाव व कामे करत असताना स्वदेस फाऊंडेशन तसेच शासनाच्या मोलाच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले, असे मत समिती सचिव वैभव वाघ, महिला मंडळ, मुंबईकर मंडळ यांनी व्यक्त केले आहे. यावेळी स्वदेस फाऊंडेशनचे मॅनेजर शिवतेज ढऊळ, तळा तालुका व्यवस्थापक राकेश मोरे, महेश पांचाळ व स्वदेस टीम तसेच पुसाटी ग्रामस्थ, महिला व मुंबईकर मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्कूल बसने गोमांसची वाहतुक

**। म्हसळा । वार्ताहर ।**

माणगाव-मोर्बा येथुन म्हसळा येथे स्कूल बसमधुन गोमांस वाहतूक करताना आढळून आल्याने पोलिसांनी दोन आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. मागणगाव येथील आरोपी डॉ. हुसेन याने गोवंश जातीच्या प्राण्याची कत्तल करून म्हसळ्यातील दुसरा आरोपीत निशाल अब्दुल गफुर (३५) याने ते २५० किलो गोमांस विक्री करिता निळ्या काळ्या रंगाच्या मैजिक स्कूल बसमधुन वाहतूक करीत असताना आढळून आला. त्यावर पोलीस शिपाई गणेश पवार यांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कहाळे, पोलीस उप निरीक्षक रोहिनकर, पोलीस उप निरीक्षक धुमास्कर, पोलीस हवालदार बांगर, पालीस शिपाई मुल्ला, हंबिर, राठोड यांनी आरोपी म्हसळाकडे येत असताना त्याच्या गाडीचा पाठलाग केला. आरोपी म्हसळ्यातील ढोर्जे फाटा येथे आला असता तेथे त्याला पकडुन स्कूल बसची तपासणी करण्यात आली. यावेळी त्या स्कूल बसमधुन गोहत्या केलेले मांस आणि बस सह ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



● श्रीवर्धनची ग्रामदेवता आई सोमजादेवी दरवर्षी आपल्या भक्तांना आशिर्वाद देण्यासाठी शहरात सिहांसनावर आरुढ होऊन येत असते. या रथोस्तवाला शहरातील भक्तांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमणावर गर्दी केली होती. (छायाचित्र : प्रसाद नाझरे)

# ‘भाताचे हमी भाव केंद्र सुरु करा’




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. मात्र, कर्जत तालुक्यात शासनाचे भात खरेदी करणारे एकच केंद्र सुरु झाले आहे. या हमी भाव भात खरेदी केंद्राचे नेरळ येथील केंद्र सुरु करावे, अशी मागणी नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे सदस्य आणि शेतकरी संदीप मसने यांनी केली आहे.

कर्जत तालुक्यात खरीप हंगामात भाताचे सर्वाधिक पीक घेतले जाते. यावर्षी सरत्या पावसामुळे भाताचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेले आहे. पावसामुळे भाताच्या पिकावर आणि उत्पन्नावर मोठे परिणाम झाले आहेत. तरीदेखील शेतकऱ्यांनी भाताचे पीक गोळा करून साठवून ठेवले आहे. कर्जत तालुक्यात भाताची सर्वाधिक शेती केली जात असल्याने भाताचे पीक प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरात जमा झाले आहे. भाताच्या पिकाची साठवण करून दीड महिना लोटला असून भाताचे हमी भाव खरेदी केंद्र तालुक्याच्या वेगवेगळ्या भागात

**■ भाताचे पीक शेतकऱ्यांच्या घरात जमा**

**■ दीड महिना लोटला तरी केंद्र सुरू नाही**

अद्याप सुरु झालेले नाही.कर्जत येथे खरेदी विक्री संघात भाताचे हमी भाव खरेदी केंद्र सुरु झाले असून तेथे कर्जत परिसरातील शेतकऱ्यांनी भाताची विक्री करण्यास सुरुवात केली आहे.

याबवबत नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे सभापती राजेंद्र विरले यांनी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भाताचे हमी भाव केंद्र नेरळ येथे सुरु होईल, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले आहे. तर, तालुक्यातील शेतकऱ्यांनी भाताचे ऑनलाईन नोंदणी करुन घ्यावे, अशी सूचना नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांच्यावतीने करण्यात आली आहे.

## खोपोली नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम

# श्वानांच्या निर्बिजीकरण मोहिमेला सुरुवात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरात भटक्या श्वानांची वाढती संख्या आणि श्वानदंशाच्या घटना नियंत्रित करण्याकरीता नगर परिषदेच्यावतीने श्वानांचे निर्बिजीकरण आणि अँटी रेबीज व्हॅक्सिनेशन मोहिमेला सोमवारी (दि.२३) सुरवात करण्यात आली आहे. या मोहिमेचा संकल्प मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केला असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार पेट्स फोर्स या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.






या मोहिमेत खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्यासह माजी नगरसेवक किशोर पानसरे, सामाजिक कार्यकर्ते विजय तेंडुलकर, जैन संघटनेचे किशोर ओसवाल, गोरक्षक तथा प्राणीमित्र हनीफ कर्जीकर, अमोल ठकेकर, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य, नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

श्वानांचे निर्बिजीकरण या मोहिमेत खोपोली शहरातील भटक्या श्वानांना टप्प्याटप्प्याने विभागवार सुरक्षित पकडण्यात येणार असून त्यांना रेस्क्यू व्हॅनमधून निर्बिजीकरण केंद्रात नेण्यात येणार आहे. निर्बिजीकरणासोबत अँटी रेबीज व्हॅक्सिनेशनही केले जाणार असून शस्त्रक्रियेनंतर श्वानाची प्रकृती स्थिरस्तावर झाल्यानंतर ज्या विभागातून त्यांना ताब्यात घेतले आहे तेथेच पुन:श्च सोडण्यात येणार असल्याची माहिती पेट्स फोर्स संस्थेचे विनोद साळवी यांनी दिली आहे. सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय परिसर आणि समाज मंदिर रोडवरील श्वानांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच, दररोज ही मोहीम राबवण्यात येणार असून या मोहिमेचे सर्व स्तरावरून स्वागत होत आहे.

# अस्सल दिग्दर्शक गेला

सिनेमा हे अद्भुत माध्यम आहे. त्यात कथा, संगीत, चित्र, नृत्य सर्व काही असतं. पात्रे सजीव करता येतात. परिसर जिवंत करता येतो. संदेशही देता येतो. या सगळ्याला कसे व कोणते रुप द्यायचे हे दिग्दर्शक ठरवतो. कथाकार कोणीही असला तरी चित्रपटाची प्रत्येक फ्रेम कशी असेल व तिच्यातून काय सांगायचे आहे यावर दिग्दर्शकाची मोहोर असते. हिंदी चित्रपटसृष्टीने स्वतःचा ठसा उमटवणारे एकाहून एक दिग्दर्शक पाहिले. त्या प्रत्येकाचे स्वतःचे वैशिष्ट्य होते. राज कपूर, मनमोहनदेसाई, सुभाष घई ते राजकुमार हिरानी किंवा रामगोपाल वर्मा अशी एक प्रचंड मोठी नामावली सांगता येईल. या सर्वांचीच स्वतःची अशी सिनेमाची भाषा होती. पण हे बहुतेक जण ज्याला व्यावसायिक किंवा कमर्शियल म्हणतात असा सिनेमा काढत होते. त्यात मनोरंजन मुख्य होते. म्हणूनच त्यांना मसालापट असेही म्हटले जाई. यांचा अतिरेक झाला तेव्हा मनोरंजन हा हेतू नसलेला पण वेगळे काही सांगू पाहणारा सिनेमा तयार झाला. त्याला आर्ट फिल्म किंवा समांतर सिनेमा असे नाव मिळाले. १९५० च्या दशकात सत्यजित राय आणि नंतर ऋत्विक घटक, मणी कौल इत्यादींनी या प्रकारचे सिनेमे केले. काही मोजक्या समीक्षकांनी व लोकांनी यांची तारीफ केली. पण ते धंदा करू शकले नाहीत. गर्दी खेचू शकले नाहीत. या दरम्यान, सिनेमात जशी नायकाची एन्ट्री होते, तशी शामबेनेगल यांची एन्ट्री झाली. त्यांनी व्यावसायिक आणि समांतर या दोन्हींचा मेळ घातला. कथा, चित्रीकरण या दृष्टीने हा सिनेमा नेहमीच्या जत्रेत हरवलेल्या भावांच्या सिनेमापेक्षा वेगळा होता. पण तरीही सामान्य प्रेक्षकाला देखील बांधून ठेवेल असे त्यात काहीतरी होते. १९७४ मध्ये आलेल्या त्यांच्या अंकुर या पहिल्याच सिनेमाने उत्तम कथा आणि कलात्मक मांडणी यांचा संगम होऊ शकतो हे दाखवले.

### वास्तवदर्शी चित्रपट

अंकुरला मोठे यश मिळाले, राष्ट्रीयसह अनेक पुरस्कार मिळाले. पहिल्याच सामन्यात शतक काढावे तसा प्रकार झाला. त्यानंतर अक्षरशः वर्षा-दोन वर्षाला बेनेगल यांचे सिनेमे येत राहिले. त्यांनी अत्यंत वैविध्यपूर्ण अशा कथा हाताळल्या. त्यांचा कोणताही एक सिनेमा दुसऱ्यासारखा नाही. मंथन हा ऐन आणीबाणीत आलेला सिनेमा गुजरातेतील अमूलच्या दुग्ध क्रांतीवर आहे. दूध धंद्यात सहकारी सोसायटी रुजवण्याच्या प्रयत्नांमध्ये गावात उत्पन्न होणारी वादळे यात अचूक दाखवलेली होती. त्याचे थीमसाँग तर आजही प्रसिध्द आहे. त्या पुढच्याच वर्षी, १९७७ मध्ये आलेला भूमिका हा हंसा वाडकर यांच्या सांगत्ये ऐका या आत्मचरित्रावर आधारलेला होता. हंसा या एकेकाळच्या अत्यंत लोकप्रिय अभिनेत्री. त्यांच्या आयुष्यात अनेक पुरुष आले. पण त्यांना एका स्थैर्याची व शाश्वत नात्याची ओढ कायम राहिली. ही सर्व मांडणी त्या काळाच्या मानाने धाडसी होती. पण त्यातील हंसाबाईंसकट सर्वच पात्रांचे चित्रण त्यांच्या गुणदोषासह केलेले होते. त्यामुळे ते अत्यंत वास्तव होते. हिंदी चित्रपटात साधारणपणे हिरो म्हणजे देवाचा अवतार असे पेश करण्याची पध्दत आहे. इतर पात्रांनाही एकतर सुष्ट किंवा दुष्ट असे रंगवण्याची प्रथा आहे. ती बेनेगल यांनी मोडली. त्यांच्या सर्वच चित्रपटांमधील पात्रे ही गुण आणि दोषांनी भरलेली आहेत. तुमच्याआमच्यासारखी व रोज भेटणारी अशी सशक्त पात्रे हे बेनेगलांचे जबरदस्त वैशिष्ट्य राहिले. किंबहुना, मनमोहनदेसाई किंवा रामगोपाल वर्मा यांच्या मसालापटांमध्येही ज्या चित्रपटांमध्ये पात्रे भक्कमरीत्या रंगवलेली आहेत ते यशस्वी झाल्याचे दिसेल. (अमर अकबरएंथनीमधील अमिताभ आणि सत्यामधलाभिकू म्हात्रे ही पात्रे उदाहरणादाखल सांगता येतील.) १९८० च्या दशकात बेनेगल यांनी सांधा बदलून सामाजिक समस्यांवर व राजकारणावर थेट भाष्य करणारे चित्रपट केले. वेश्यांचे जीवन व तेथील राजकारणावर बोलणारा मंडी, आधुनिक महाभारताची कल्पना करणारा कलयुग, त्रिकाल, जुनूनइत्यादींची नावे सांगता येतील.

### अनेकांना घडवले

बेनेगल यांनी अप्रसिध्द अभिनेत्यांना सोबत घेतले व त्यांच्यातून स्टार घडवले. शबाना, स्मिता, नसिरुद्दिन, ओम पुरी, कुलभूषण खरबंदा, रजित कपूर अशा अनेकांची नावे या संदर्भात सांगता येतील. त्यांचा चित्रपट डावा किंवा उजवा अशा कोणत्या विचारसरणीला बांधलेला नव्हता. पण तो सामान्य माणसांची कथा सांगणारा व त्यांचे संघर्ष वर्णन करणारा होता. धर्मवीर भारती यांच्या कथेवर आधारित सूरज का सातवा घोडा हा चित्रपट प्रेम या विषयावरचा होता. पण तो जणू एक चिंतन वा कविता असावा अशा रीतीने त्यांनी पेश केला. सरदारी बेगम, मम्मो, झुबैदा हे मुस्लिम स्त्रियांच्या कहाण्या सांगणारे सिनेमे होते. इतिहास आणि ऐतिहासिक बाबींवरचे त्यांचे सिनेमे हाही एक अद्भुत प्रकार आहे. आरंभी नेहरुंच्याडिस्कवरी ऑफ इंडिया पुस्तकावर आधारित भारत एक खोज ही मालिका त्यांनी तेव्हाच्या दूरदर्शनसाठी निर्माण केली. तिच्यात भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासाचा सटीक आढावा होता. मेकिंग ऑफ महात्मा या सिनेमात त्यांनी आफ्रिकेमध्येगांधींचे महात्मा कसे झाले याचा शोध घेतला. पुढे सुभाषचंद्र बोस आणि अलिकडे बांगलादेशचे निर्माते मुजीबुररहमानयांच्यावर त्यांनी चित्रपट केले. भारतीय रेल्वेवरची यात्रा ही मालिकादेखील समाजाचे वेगळे दर्शन घडवणारी होती. बेनेगल हे मूळचे हैदराबादचे. गुरुदत्तशी त्यांचे नाते होते. सत्यजित रे यांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. पण त्यांनी स्वतःची वाट स्वतः तयार केली. नंतर याच वाटेने शेखर कपूरपासून ते अलिकडच्या अनुराग कश्यपयांच्यापर्यंत अनेकांना प्रेरणा मिळाली. विद्यापीठात असताना ते उत्तम जलतरणपटू होते व देश पातळीवरच्या पोहण्याच्या स्पर्धा त्यांनी गाजवल्या होत्या. त्यामुळेच भारतीय सिनेमामध्ये प्रवाहाच्या विरोधी पोहण्यात बहुदा त्यांना फारशी अडचण आली नाही. खेळाडू असण्याच्या या पार्श्वभूमीमुळेच वयाच्या नव्वदाव्या वर्षांपर्यंत ते कार्यरत होते. शेवटी मूत्रपिंडाच्या विकाराने ग्रस्त असूनही ते किमान दोन-तीन सिनेमांवर काम करीत होते. अशा या अस्सल दिग्दर्शकाला श्रध्दांजली.

विचार

# शंभर कोटी मुले हवामानबदलाच्या विळख्यात

***जगभरातील शंभर कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामानबदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.***

**मिलिंद बेंडाळ**

'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ) ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात येत्या काही वर्षांमध्ये मुलांच्या दृष्टीने पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या अहवालानुसार, येत्या काही दशकांमध्ये म्हणजे २०५० पर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे. अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठपट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे, की मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. याव्यतिरिक्त, २००० च्या तुलनेत पुराचा धोका तिप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुले आपल्या घरातून आणि शाळांमधून विस्थापित होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार येत्या काही वर्षांमध्ये उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार असून २०५० पर्यंत हा धोका २००० च्या तुलनेत दुप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या जीवाला आणि मालमत्तेला धोका निर्माण होऊ शकतो. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता-पूर-दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. कारण हवामान बदलामुळे त्यांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि जीवनमानावर खोलवर परिणाम होऊ शकतो. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे की हवामानबदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे. मुलांना अन्नातून आधीपासूनच आवश्यक प्रमाणात प्रथिने देऊ न शकणाऱ्या देशांमध्ये हवामान बदलांना तोंड देण्यासाठी एक योजना तयार करावी लागेल, जेणेकरून मुलांचे सुरक्षित आणि निरोगी भविष्य सुनिश्चित करता येईल.

जगातील कोट्यवधी मुले सध्या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामानबदलामुळे मोठा विद्ध्वंस होऊ शकतो. जगातील ३३ देशांमध्ये येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची बाब म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, एकत्रितपणे केवळ नऊ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही, या देशांमधील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे. याचा अर्थ हवामानबदलामुळे या समस्येला फारसे जबाबदार नसलेल्या देशांमधील मुलांचे सर्वाधिक नुकसान होत आहे. हवामानबदलाचे परिणाम अतिशय असमानपणे पसरत असल्याचे या परिस्थितीवरून दिसून येते. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणाऱ्या देशांच्या मुलांवर जास्त परिणाम होत आहे, तर जास्त उत्सर्जन करणाऱ्या देशांच्या मुलांवर हा परिणाम कमी आहे.

'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामानबदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत ७.४ गुणांसह २६ व्या स्थानी आहे. पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगलादेश, इथियोपिया ७.६ गुणांसह चौदाव्या आणि पंधराव्या स्थानी आहेत. लिंचेस्टीन हा युरोपीयन देश २.२ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला असून या यादीत शेवटच्या म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ (युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड) ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे. १९४६ मध्ये विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील मुलांना, भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. जगातील मुलांचे जीवनमान सुधारणे हे 'युनिसेफ'चे उद्दिष्ट आहे. त्यांचे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही संस्था काम करते. 'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यासारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि भेदभाव दूर करण्यासाठी कार्य करते. गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या देशांमध्ये ही संस्था विशेष सक्रिय आहे. येथे युनिसेफ जगभरातील मुलांच्या हक्कांसाठी मोहीम राबवते आणि मुलांसाठी धोरणात्मक बदल आणि चांगल्या सेवा साध्य करण्यासाठी सरकार आणि इतर संस्थांसोबत काम करते.

जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. आकाराने खूप लहान असलेल्या या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालु या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण तेथे अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगिकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. क्युबाचे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे कारण त्याचा औद्योगिकीकरणाचा दर खूपच कमी असून ऊर्जास्रोत स्वच्छ आहेत. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका तर वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन' या अहवालानुसार हवामान-संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्या प्रवेशातील असमानता ही आजची मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे २०५० पर्यंत मुलांच्या जीवनात नाट्यमय बदल घडून अनेक मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. जागतिक स्तरावर वाढणारे तापमान भविष्यात मोठा धोका निर्माण करु शकते.

२०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम लहान मुलांवर अधिक गंभीरपणे होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील देशांमध्ये अतिउष्णतेचा सामना करणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की मुलांना हवामान आपत्तींपासून ऑनलाइन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. हवामानबदल आणि बालविवाह अशा दुहेरी संकटाचा सामना करणाऱ्या मुली, अजूनही योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या मते २०५० मध्ये चांगले भविष्य घडवण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील. या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांमध्ये उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; मात्र त्याच वेळी वृद्धांची संख्याही वाढत आहे. असा अंदाज आहे की जगातील प्रत्येक प्रदेशातील लोकसंख्येतील मुलांचा वाटा कमी होऊ शकतो. आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही ही लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. २००० च्या दशकात लोकसंख्येतील हा हिस्सा सुमारे ५० टक्के होता. त्याचप्रमाणे, पूर्व आशियामध्ये २००० मध्ये असणारा २९ टक्के वाटा आता १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपमध्येही असेच काहीसे चित्र पहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील. काही देशांमध्ये लहान मुलांसाठी सेवा विस्तारित करण्याचा ओढा वाढेल. त्याच वेळी, काही देश वृद्ध लोकांच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत असतील. बदलत्या जगात मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही मुले उद्याचा पाया आहेत. त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत, तर त्यांचे भवितव्य टांगणीला लागेल. **

आजकाल

# वेगळ्या वाटेवरचा प्रवासी

रुपेरी पडद्यावर वेगळ्या धाटणीच्या, विषयांच्या आणि सामाजिक आशय जपणाऱ्या चित्रपटांच्या मालिकेतील पहिले पुष्प गुंफणारे श्याम बेनेगल हे नाव काळाच्या पडद्याआड गेले. अतिशय हुशार, कलात्मकदृष्ट्या संपन्न आणि कल्पक असणाऱ्या या दिग्दर्शकाने समांतर चित्रपटांचा एक ट्रेंड सेट केला. पुढे अनेकांनी त्यांचा आदर्श पुढे ठेवत मार्गक्रमणा केली. या अर्थाने आज अनेकांचा वाटाड्या हरपला आहे... सुप्रसिध्द अभिनेते मोहन आगाशे यांनी वाहिलेली श्रध्दांजली.

**मोहन आगाशे**

ख्यातनाम दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दुखद आहे. १९७५-७६ मध्ये मी त्यांच्याबरोबर काम केले. या दोन वर्षांव्यतिरिक्त कधी तसा योग आला नाही. पण आजही निशांत आणि मंथनचे ते दिवस आठवतात. पुढे त्यांच्या भूमिकाचे चित्रीकरण पुण्यात सुरू होते आणि त्यात मी पाहुण्या कलाकाराची भूमिका बजावली होती. मात्र त्याला काम म्हणता येणार नाही. हे सगळे बघता त्यांच्याबरोबर काम केलेल्याला सुमारे पन्नास वर्षांचा काळ उलटला आहे. त्यानंतरच्या काळात त्यांच्या चित्रपटात मी नसण्यामागे काही कारणे होती. त्यातील एक म्हणजे मी पुण्यात राहणारा आणि दुसरे म्हणजे मी हॉस्पिटलरध्ये काम करायचो. त्यामुळे वेळेची गणिते जमवण्यात अडचण यायची. खेरीज आपल्या चित्रपटांमध्ये नवनवीन लोकांना संधी देणे त्यांना आवडायचे. त्यामुळेच एनसीडीमधून उत्तीर्ण झालेल्या अनेकांना त्यांनी ब्रेक दिला. त्यामध्ये नसिरुद्दीन शहा, ओम पुरी, शबाना आझमी, नीना गुप्ता, स्मिता पाटील अशी नावे घेता येतील. या सगळ्याबरोबर हेदेखील मान्य करायला हवे की, प्रत्येक निर्माता- दिग्दर्शकाचे काही गट असतात. तसा त्यांचाही होता. जसा जब्बार पटेल आणि आम्हा मंडळींचा एक ग्रुप होता. तसेच हे काहीसे. अर्थात त्यांनी चित्रपट करणे बंद केल्यामुळे तोदेखील पुढे बंद झाला ही बाब वेगळी... अशाच प्रकारे सत्यदेव दुबेंचे थिएटर युनीट होते. त्यातून ते अमरीश पुरी, अमोल पालेकर आणि पुढे शशी कपूरसारख्या कलाकारांना चित्रपटांमधून घेत राहिले. याला आपण प्रवाह बदलत जातो, असेही म्हणू शकतो. अर्थातच प्रवाह बदलला की विचारही बदलत जातात.

शाम बेनेगल यांच्या चित्रपटांनी प्रवाह आणि विचार बदलण्याचे काम केले. या माणसाने अगदी जिद्दीने या क्षेत्रात पाय रोवले आणि खंबीरपणे होता त्या जागी उभा राहिला. त्यांना पहिली फिचर फिल्म करण्यासाठी तब्बल वीस वर्षे वाट पहावी लागली. त्याआधी ते जाहिराती, डॉक्युमेंटरी, कॉर्पोरेट फिल्मस या क्षेत्रामध्ये कार्यरत होते. मात्र योग्य संधी मिळताच त्यांनी फीचर फिल्म केली आणि अंकुर या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाने समांतर चित्रपटांच्या विश्वात एक ट्रेंड सेट केला. तोपर्यंत हे वारे बंगाल आणि मल्याळी चित्रसृष्टीपुरतेच सीमित होते. त्यामुळेच चित्रसृष्टीत समांतर चित्रसृष्टी सुरू करण्याचे सगळे श्रेय श्याम बेनेगल यांना जाते. १९६०-७० च्या दशकात समांतर सिनेमा जन्माला आला, वाढलापण अल्पायुषी ठरला, कारण टेलिव्हिजनचे विश्व विस्तारण्याचा तोच काळ होता. त्यामुळे टीव्ही मोठा झाला तसे समांतर चित्रपट करणारे सगळे तिकडे वळाले. याचे कारण म्हणजे तेवढ्या बजेटमध्ये चित्रपट करणे, तो प्रदर्शित करणे शक्य होत नव्हते. हा प्रवाह थांबण्यामागील हे आर्थिक कारणही लक्षात घ्यायला हवे. म्हणूनच सत्यजीत रे यांच्यापासून श्याम बेनेगलांपर्यंत सगळ्यांनी टेलिव्हिजन मालिका केल्या. अर्थात त्यातही त्यांनी वेगळेपण दाखवले. यात्रा, भारत की खोज यासारख्या मालिका आजही अनेकांच्या स्मरणात असतील.



असे असले आणि चांगले नाव झाल्यानंतरही श्याम बेनेगल यांचा पुढचा प्रवास सुकर झाला, असे म्हणता येणार नाही, कारण अशा दिग्दर्शकांनाही निर्माते मिळणे अवघड जातेच. श्याम बेनेगल यांनाही या समस्येचा सामना करावा लागला. म्हणून त्यांनी मंथन केला. यातही त्यांनी सामाजिक विषयालाच हात घातला होता. असाच काळ सरला आणि पुढे पुढे तर ते केंद्र सरकारचे लाडके दिग्दर्शक झाले. मेकिंग ऑफ महात्मा, नेताजी सुभाषचंद्र, हरीभरी, भारत: एक खोज यासारखी उदाहरणे याची साक्ष देतील. थोडक्यात, प्रोड्युसर म्हणून केंद्र सरकारची साथ मिळवण्याचे भाग्य त्यांना लाभले आणि त्यामुळेच आपल्याला हवे तसे चित्रपट त्यांना करता आले. आधी उल्लेख केल्याप्रमाणे याच कारणास्तव पुढे त्यांना प्रोड्युसर मिळण्यात खूप अडचणी आल्या.

वेगळ्या शैलीचे, सामाजिक विषयांना हात घालणारे, वेगळा प्रवाह निर्माण करणारे चित्रपट दिल्यामुळे जगात त्यांचे मोठे नाव झाले. ठिकठिकाणी ज्युरी म्हणून त्यांना आमंत्रणे येऊ लागली. त्यांचा वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आणि हे नाव चित्रसृष्टीमध्ये वेगळा दबदबा निर्माण करणारे ठरले. मुळात श्याम हुशार होते. त्यांचे वाचन अफाट होते. गिरीश कर्नाड आणि त्यांच्यामध्ये अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध होते. आमच्या तिघांबद्दल बोलायचे तर सारस्वत मैत्री होती, असे गमतीने म्हणता येईल. त्यांची आणि गिरीशची मैत्री बरीच घट्ट होती. मुळात अभिनेता नसणाऱ्या गिरीशला त्यांनी या साच्यामध्ये चपखल बसवले.

व्यक्ती म्हणून ते मोठे होतेच. कुतूहल जपणारा, अभ्यासू असा हा माणूस होता. माझे त्यांच्याबरोबरचे संबंधही अगदी जिव्हाळ्याचे होते. कधीही भेटलो तरी आपुलकीने विचारपूस करणारा तो चांगला मित्र होता. पद्मश्री मिळाल्यानंतर माझे अभिनंदन करण्यासाठी ते खास मुंबईहून आले होते. थोडक्यात, बराच काळ एकत्र काम केले नसले तरी आमच्या संबंधांमध्ये वा मैत्रीमध्ये कधी दुरावा निर्माण झाला नाही. भेटल्यानंतर मनमोकळ्या गप्पा व्हायच्याच आणि त्याच वेळी, मी तुला एक काम देणे लागतो, असेही त्याचे वाक्य असायचे. तो योग आला नाही, ही बाब वेगळी. पण त्यामुळे नात्यामध्ये कधी फरक पडला नाही. खरे सांगायचे तर जब्बार, माणिकदा वा श्याम यांच्या युनिट्समध्ये एखाद्या कुटुंबासारखे वातावरण असायचे. सगळे त्याच आपुलकीने काम करायचे. पुढे काळ बदलला, टीव्ही आला आणि त्याचेही कार्पोरेटायझेशन झाले. त्यावर कमी बोलावे तेवढे बरे. पण तो काळ परत आला तर मला सिनेमा करायला परत मजा वाटेल हे मात्र नक्की. श्याम बेनेगल यांना भावपूर्ण श्रद्धांजली. **

लोकसंसद

## जगाप्रमाणे भारत सुद्धा कर्जाच्या विळख्यात

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वर्ल्ड इकॉनॉमिकस आऊट लुक नुसार यंदा जगामध्ये पाच ट्रिलियन डॉलर्स एवढे कर्ज वाढले आहे.जगातील वृद्धांची वाढती संख्या, आरोग्य सेवेचा खर्च, राजकीय तणावामुळे वाढलेला संरक्षण खर्च, यामुळे जागतिक कर्जात वादच होत आहे. जगातील कर्जाचा विचार करता अमेरिकेवर सर्वात जास्त कर्ज आहे. ते सुमारे ३६ ट्रिलियन डॉलर्स एवढे आहे. त्या खालोखाल चीनचा नंबर लागतो. चीनवर सुमारे १६ ट्रिलियन डॉलर्स एवढे कर्ज आहे. विशेष म्हणजे अमेरिका ही जगात अर्थव्यवस्थेच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर ब्रिटन व फ्रांस तसेच इटली या राष्ट्रांचे नंबर कर्जाच्या आकडेवारीत आहेत. कर्जाच्या बाबतीत भारत सातव्या क्रमांकावर आहे देशावरील कर्ज सुमारे ३. २३ ट्रिलियन डॉलर्स एवढे असून हे प्रमाण जागतिक कर्जाच्या ३.२ टक्के एवढे आहे ही बातमी नुकतीच वाचली. इराक, चिली, सौदी अरेबिया, बांगलादेश, फिनलंड इत्यादी देश सर्वात कमी कर्जात आहेत. कर्ज हे विकासासाठी काढले असल्यास ते योग्य ठरते. हल्ली अनुत्पादक कामासाठी कर्ज काढण्याची एक नवीनच प्रथा रूढ होत आहे. आता महाराष्ट्राचे उदाहरण समोर घेऊ . महाराष्ट्राचे कर्ज सुमारे ७८२९९१ कोटी रुपये एवढे आहे अलीकडच्या काही वर्षात ते वाढत चालल्याचे दिसते एकूणच यावर सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे

**शांताराम वाघ पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२५ डिसेंबर**

**१८५३ : -** मराठी भाषा आणि संतसाहित्याचे अभ्यासक रेव्ह. जस्टिन एडवर्ड यांचा जन्म. ख्रिस्ती मिशनरी असणाऱ्या रेव्ह. जस्टिन यांची संतसाहित्यासंबंधीची दुषित मते संतसाहित्याच्या अभ्यासाने बदलली. त्यांनी लिहिलेली संतचरित्रे मराठी वाङ्:मयाभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. **१९१४ :** ख्यातनाम साहित्यिक माधव गोविंद काटकर यांचा जन्म. 'जयजयवंती', 'मधुधरा', 'गाजराची पुंगी' ही काव्ये, तसेच 'अहिल्याबाई होळकर', 'लो. टिळक', 'विवेकानंद' यांच्या चरित्रासह 'करामती पिट्टू','रहस्यभेद' मिळून सात कादंबऱ्या आणि 'कांचनगडचे रहस्य', 'गाणारा पक्षी', 'साहसकथा','अजब कथा', 'प्राण्यांचे जग', 'राजकन्या हेमलता' मिळून २५ हून अधिक पुस्तके बालसाहित्यावर लिहिली. **१९१४ :** विज्ञानलेखक डॉ. चिंतामण श्रीधर कर्वे यांचा जन्म. 'निळे आकाश', 'अणुशक्ती शाप की वरदान','चला चंद्राकडे', 'अणूतून अनंताकडे', 'अग्निबाण' ही त्यांनी ५० वर्षांपूर्वी लिहिलेली पुस्तके ! याशिवाय 'चला अन्य ग्रहावर', 'जीवन विज्ञान आणि तत्त्वज्ञान', 'मानवाचे भवितव्य', 'विराट विश्वाची निर्मिती', 'सूर्य जन्म आणि मृत्यू' अशी विज्ञान पुस्तके लिहिलीत. **१९१७ : -** लेखिका संस्कृत, मराठी व तौलानिक भाषा आणि साहित्य यांच्या अध्यापिका डॉ. शैलजा करंदीकर यांचा जन्म. 'इस्लाम' ह्या ग्रंथासह भारतीय काव्यशास्त्रातील काही प्रश्न' हा साहित्य शास्त्रावर आधारित ग्रंथ त्यांचा प्रसिध्द आहे. **१९२५:-** कथाकार दामोदर गोविंद देशपांडे यांचा जन्म. 'सिनिक' या टोपणनावाने त्यांनी लेखन केले. 'सिनिक कथा', 'प्लस सिनिक कथा', 'हाय मोगलाई' हे कथासंग्रह प्रसिद्ध. **१९३९:** लेखक डॉ. प्रफुल्लचंद्र लक्ष्मण चौधरी यांचा जन्म. 'जनरल नॉलेज' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९४०:-** लेखिका, बालसाहित्यिका सौ. स्मिता वामन देवधर यांचा जन्म. आकाशवाणीवर कथाकथन, भाषणे, चर्चा अशा विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग. आतापर्यंत चाळीस एक पुस्तके प्रकाशित त्यात 'प्रायश्चित', 'पळवाट' मिळून चार कथासंग्रह. 'संचित', 'विनाशकाले जागृती' ह्या कादंबऱ्या. 'परदेशी', 'जळमटं' ह्या एकांकिका. याशिवाय चिपळूणच्या विकासावर चिपळूणच्या आठवणी', आंब्याची माहिती देणारा 'फळांचा राजा आंबा' या पुस्तकासह लहानग्यांसाठी ५० भारतीय क्रांतिवीर' तसेच वृक्ष संजीवनी', 'सागराच्या तळाशी', 'शालेय भाषणे', 'शालेय निबंध', 'पर्यावरण आणि मानव' इ. पुस्तके प्रकाशित. **१९४०:-** कथा-कादंबरीकार प्रा. रावसाहेब रंगराव बोराडे यांचा जन्म. 'पेरणी', 'मळणी', 'राखण', 'खोळंबा' मिळून १५ कथासंग्रह. तसेच 'पाचोळा', 'सावट', 'चारापाणी', 'आमदार सौभाग्यवती' या कादंबऱ्या. 'पिकलं पान', 'विहीर' ही नाटके आणि काही बालसाहित्य त्यांच्या नावावर आहे. :- लेखक, चित्रकार विनायक वसंतराव डंके यांचा जन्म. 'अभिहत', 'कोसळल्या छाया', 'थोडी ओली पाने', 'बिंदू एके बिंदू', 'बीज', 'वृक्षछाया' आणि कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९७२ :-** लेखिका सुप्रिया विवेक देशपांडे यांचा जन्म. 'श्री ज्ञानेश्वरी : ओवी सूची (कुंटे प्रत) हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९७८:-** इतिहासकार राजाराम विनायक ओतूरकर यांचे निधन. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी लिहिलेली पुस्तके विद्यार्थीप्रिय ठरली. 'पत्ररुप महाराष्ट्राचा इतिहास', 'हिंदुस्थानचा साधनरुप इतिहास', 'पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार' ही त्यांची पुस्तके त्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाची साक्ष देतात. **१९९१ :** ख्यातनाम समीक्षक वामन लक्ष्मण कुलकर्णी यांचे निधन. व्यासंगी प्राध्यापक अशी ओळख असणाऱ्या वा. ल. नी महाविद्यालयात असतानाच 'पारिजात' च्या स्थापनेत व संपादनात सहभाग. **१९९९:-** कुळकर्णी ग्रंथागार या प्रकाशन गृहाचे संस्थापक, पंडितराव कुळकर्णी तथा पंडित अनंत कुळकर्णी यांचे निधन. अनेक नामवंत लेखकांची साडेचारशेहून अधिक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. बखर एका प्रकाशाकाची या नावाने त्यांनी आत्मवृत्त ही लिहिले. **२००५ :-** ज्येष्ठ वैदर्भीय कवी मनोहर महादेव देशपांडे यांचे निधन. विदर्भ साहित्य संघाच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित झालेल्या मनोहर यांचे 'वनफूल आणि अंतर्देशी' हे काव्यसंग्रह प्रकाशित.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# पोलिसांनीच सूर्यवंशीची हत्या केली

## न्यायासाठी कायदेशीर पाठपुरावा करू; राहुल गांधी यांचा ठाम विश्वास

**। परभणी । प्रतिनिधी ।**

**पोलीस कोठडीत मारहाण झाल्यामुळेच सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला आहे आणि याला पोलिसच जबाबदार आहेत. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळ अधिवेशनात दिलेली माहिती पूर्णतः खोटी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राज्यघटनाविरोधी धोरणच या सर्व घटनाक्रमाला कारणीभूत आहे. या प्रकरणात आम्ही पूर्ण चौकशीची मागणी करणार आहोत. यातून सत्य बाहेर येईल व सूर्यवंशी कुटुंबीयांना न्याय मिळेल, सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर लढ्याचा पाठपुरावा करू, असा ठाम विश्वास विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी व्यक्त केला आहे.**




राहुल गांधी यांनी सोमवारी (दि.२३) दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यावेळी त्यांनी सूर्यवंशी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली आणि तब्बल २५ मिनिटे कुटुंबीयांसोबत संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. या प्रकरणामध्ये झालेल्या अत्याचाराची राहुल गांधी यांनी माहिती घेतली. यावेळी, सूर्यवंशी यांच्या आईने अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी 'माझ्या मुलाची हत्याच झाली आहे, मला न्याय मिळवून द्या,' अशी मागणी केली. यावर राहुल गांधी यांनी आम्ही तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. कायद्याद्वारे निश्चित न्याय मिळवून देऊ, असे आश्वासन दिले आहे.

यावेळी, माध्यमांशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले की, सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना मी भेटलो असून ज्या लोकांना मारहाण झाली त्यांनाही भेटलो आहे. सूर्यवंशी कुटुंबीयांनी मला शवविच्छेदन अहवाल दाखविला. व्हिडिओ देखील दाखविला, मी काही छायाचित्रेही पाहिली. हा शंभर टक्के कोठडीत झालेला मृत्यू आहे. पोलिसांनी सूर्यवंशी यांची हत्या केली असून पोलिसांना मेसेज देण्यासाठी मुख्यमंत्री विधानसभेमध्ये खोटे बोलले असल्याचे त्यांनी सांगितले आहे. दरम्यान, राहुल गांधी यांनी आंबेडकरी चळवळीतील दिवंगत नेते विजय वाकोडे यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांच्या कुटुंबीयांचेही सांत्वन केले.

यावेळी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चेन्निथला, प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, खा. वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर, खा. प्रणिती शिंदे, खा. संजय जाधव, आ. डॉ. राहुल पाटील, जिल्हाध्यक्ष सुरेश वरपूडकर, मा.आ. सुरेश देशमुख आदी उपस्थित होते.

## आंब्यांची कलमे होरपळून नुकसान

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील गोळप गार्डीवाडी येथील भागामध्ये रविवारी (दि.२२) अचानकपणे लागलेल्या आगीत संकेत राडये, संजय राडये व चंद्रकांत सोलकर यांच्या बागांना आग लागल्याने आंब्यांची कलमे होरपळून नुकसान झाले आहे. गोळप परिसरामध्ये सध्या थंडीची लाट मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आंबा कलमांना मोठ्या प्रमाणात मोहर येऊ लागला आहे. दरम्यान, रविवारी दुपारच्या वेळी परिसरात अचानकपणे गवताला लागलेली आग या शेतकऱ्यांच्या आंबा बागेत शिरली. स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने अर्धा पाऊण तासाने आग नियंत्रणात आणण्यात यश मिळाले. परंतु, या आगीत २५ ते ३० आंब्याची कलमे होरपळून ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ डिसेंबर

१) श्री.सुभाष पुंडलिक संसारे
मु.झिराड, अलिबाग
२५-१२-१९४६

२) श्री.मोहन विठ्ठल कुंटे
अलिबाग, २५-१२-१९५३

३) श्री.भगवान दगडू नागोठणेकर
चेंढरे-अलिबाग, २५-१२-१९५४

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. गीता चंद्रकांत पाटील, द्वितीय स्मृतिदिन, अलिबाग**

## भाजपच्या आमदाराचे नाराजीचे सूर

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर महायुतीत मंत्रीपदावरून जोरदार रस्सीखेच झाली. मंत्रीमंडळाचा विस्तार झाल्यानंतर नाराजीचे सूरही उमटू लागले आहेत. छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे यांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवल्यानंतर आता आणखी एक भाजप आमदार देखील नाराज असल्याचे समोर येत आहे. ठाण्यातून तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले भाजप आमदार संजय केळकर यांनी मंत्रीपद न मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे.



केळकर म्हणाले की, याबाबतचे सर्व निर्णय पक्षाचे केंद्रीय व राज्य नेतृत्व घेत असते. त्यांना कदाचित मी तितका लायक वाटलो नसेन त्यामुळे मला मंत्रीपद दिले नसेल, अशी खंत केळकर यांनी व्यक्त केली आहे. ते पुढे म्हणाले की, मी पक्षाच्या स्थापनेपासून काम करत आहे. त्यावेळी काम करताना कधी आमदार मंत्री व्हायचा विचार केला नव्हता. परंतु, आता पक्षश्रेष्टींना जेव्हा मी मंत्रीपदासाठी लायक वाटेन तेव्हा ते जबाबदारी देतील, असेही केळकर म्हणाले आहेत.

## उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने महानगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून शिव सर्वेक्षण यात्रा सुरू करण्यात आली होती. यावेळी मुंबईतील ३६ विधानसभा क्षेत्रांसाठी नेमणूक केलेल्या निरीक्षकांनी आपला अहवाल पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिला आहे. त्यानंतर आता जानेवारीपासून उद्धव ठाकरे मुंबईतील सर्व शाखांना भेट देणार असून शाखाप्रमुखांशी संवाद साधणार आहेत. दरम्यान, २६ डिसेंबरपासून शिवसेना ठाकरे गटाच्या मातोश्रीवर बैठकांचे सत्र सुरू होणार आहे.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यात महापालिका निवडणुकीचे वेध लागले आहेत. अशामध्ये आता सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली असून शिवसेना ठाकरे गटानेदेखील आता पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश आले होते. परंतु, विधानसभा निवडणुकीत मविआला मोठा फटका बसला. मात्र, आगामी महापालिका निवडणुकींमध्ये विधानसभेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी मविआचे नेते सावधगिरी बाळगणार आहेत. याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे ॲक्शनमोडमध्ये आले आहेत.

## आरोपींना पकडायची हिंमत आहे का?




### संजय राऊत यांची मुख्यमंत्र्यांवर टिका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

संतोष देशमुख यांच्या खूनाच्या कारस्थानात ज्यांचा हात आहे त्या व्यक्तीचा मंत्रीमंडळात समावेश आहे. या खऱ्या आरोपींना पकडायची हिंमत देवेंद्र फडणवीसांमध्ये आहे का अशा शब्दात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे.

महाराष्ट्रातील कायदे सुव्यवस्थेची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत खोटं बोलत आहेत. संतोष देशमुखची हत्या महाराष्ट्राच्या डोळ्यासमोर झाली आहे. व्हिडीओ आहेत त्याचे तरीही तुम्ही ते लपवायचा प्रयत्न करत आहात. महाराष्ट्राची परिस्थिती बिहारपेक्षा गंभीर आहे हे फडणवीसांनी समजून घ्यावे. परभणी बीडमध्ये ज्या घटना घडल्या आहेत त्या राज्याच्या प्रतिष्ठेला कलंक, काळीमा फासणाऱ्या आहेत आणि त्या भयंकर अपराधाशी संबंधित संशयित आरोपी आपल्या मंत्रीमंडळात बसलेले आहेत. आपण त्यांना घेतलेले आहे, असे संजय राऊत म्हणाले आहेत.

संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशींच्या हत्येची जबाबदारी या राज्याच्या गृहमंत्री व मुख्यमंत्र्यांनी घ्यायला हवी होती. सरकारची जबाबदारी होती त्यांचे प्राण वाचवायची. ज्यांनी या हत्या घडवल्या त्यांना पाठिशी घालत आहात. याच्यावर बोला. खरंतर मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्षपदी जस्टिस सुब्रमण्यम यांची कालच नेमणूक झाली. परंतु, सगळे गुलाम आहेत ते मोदींचे. हा महाराष्ट्र मानवता व माणूसकीसाठी ओळखला जात होता. गेल्या पाच वर्षात महाराष्ट्रात रोज माणूसकीचा खून होत आहे. फडणवीस विधानसभेत खोटं बोलत आहेत. आम्हाला लाज वाटते याची, अशा शब्दात संजय राऊत यांनी फडणवीसांनवर निशाणा साधला आहे.

## विद्यार्थ्यांची क्रुर थट्टाः आव्हाड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यसेवा आयोगातर्फे रिक्त जागांवर भरती करण्यात येणार आहे. मात्र, पदासाठी ४४१ जागा रिक्त असताना केवळ २१६ जागांची भरती आता करण्यात येणार आहे. तसेच, तहसीलदार सारख्या महत्वाची पदं रिक्त असताना देखील या पदांसाठी भरती काढण्यात आलेली नाही. त्यावरून राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी राज्य सरकारला फटकारले आहे. तसेच, राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी करू नका, अशी विनंती देखील आव्हाड यांनी सरकारकडे केली आहे. राज्यसेवा तर्फे ज्या रिक्त जागा भरण्यात येणार आहेत, त्या जागांची यादी बघितल्यानंतर राज्यसेवा आयोग नेमक काय करत आहे, हेच कळत नाही. राज्यसेवेच्या मागील परिपत्रकात पदासाठी ४४१ जागांची भरती करण्यात येणार होती. त्या जागा कमी करून केवळ २१६ जागांची भरती आता करण्यात येणार आहे. शिवाय, तहसीलदार सारख्या महत्वाच्या पदांच्या तर जागाच काढण्यात आलेल्या नाहीत. ही परिक्षा पास होण्यासाठी दिवस रात्र एक करत असलेल्या लाखो विद्यार्थ्यांची ही क्रूर थट्टा असल्याचे म्हटले आहे.

## परप्रांतीय पांडेच्या उलट्या बोंबा

### पोलीस पाठीशी घालत असल्याचा आरोप

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

धूप लावण्याच्या किरकोळ वादातून एका माथेफिरू परप्रांतीय अधिकाऱ्याने मराठी कुटुंबाला गुंडांकरवी बेदम मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच मराठी कुटुंबातील एका अल्पवयीन मुलीचा परप्रांतीय कुटुंबातील उत्तम पांडे याने विनयभंग केला होता. याचे तीव्र पडसाद कल्याण, डोंबिवलीत उमटले आहेत.

विनयभंग प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी मराठी कुटुंब परप्रांतीय कुटुंबीयांकडे गेले असता पांडेच्या कुटुंबाने मराठी कुटुंबाला बेदम मारहाण केली होती. यानंतर पांडे पसार झाला होता. मात्र,




रविवारी त्याने मराठी कुटुंबातील तीन सदस्यांविरुद्ध मानपाडा पोलीस ठाण्यात रात्री मारहाणीची तक्रार दाखल केली. पांडेला अटक करणाऐवजी त्याची खोटी तक्रार दाखल करून घेणाऱ्या पोलिसांविरुद्ध संताप व्यक्त होत आहे.

आरोपी उत्तम पांडे हा नवी मुंबई येथे खासगी दवाखान्यात उपचार घेत असल्याचे नाटक करत आहे. मुलीचा विनयभंग आणि तिच्या पालकांना मारहाण करणाऱ्या परप्रांतीय पांडेला पोलीस पाठीशी घालत असल्याचा आरोप पीडित मुलीच्या आईने केला आहे. हॉस्पिटलमध्ये बसून पांडे पोलिसांत तक्रार देतो आणि कोणतीही चौकशी न करता पोलीस त्याची फिर्याद नोंदवतात याला काय म्हणावे, अशा उद्विग्न प्रतिक्रिया कल्याणमध्ये व्यक्त होत आहेत. मराठी कुटुंबावर अन्याय होऊनही त्यांच्यावरच गुन्हा दाखल करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी दाखवलेल्या कार्यतत्परतेबद्दल सर्वत्र संताप आहे.

> **कल्याणमध्ये गेल्या चार दिवसांपासून घडत असलेल्या घटनांची सरकारने गंभीर दखल घ्यावी. अशा प्रकरणांच्या तपासात वेळकाढूपणा करून आरोपींना पाठीशी घातले जात आहे. पोलिसांनी आरोपींना तत्काळ अटक करावी. मराठी कुटुंबीयांवर जे हल्ल्याचे प्रकार सुरू आहेत ते त्वरित थांबले नाही तर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन केले जाईल.**
> **-दिपेश म्हात्रे, माजी नगरसेवक**

## 'आधी कोकणला पाणी द्या'

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई, पुण्यात एक दिवस नळाला पाणी आले नाही तर ओरड होते; परंतु कोकणातील महिला हंडाभर पाण्याकरीता दोन किमी उन्हातून पायपीट करते, याची वेदना कोणालाच नाही. त्यामुळे कोकणातील महिलांच्या डोक्यावरचा हंडा खाली उतरवा आणि मग मराठवाड्याला पाणी द्या, अशी स्पष्ट भूमिका कोकणचे अभ्यासक ॲड. विलास पाटणे यांनी मांडली आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याप्रश्नी न्यायाची भूमिका घेतील, ही कोकणवासीयांची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## संगमेश्वरात वाळूमाफियांचा हैदोस

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यात वाळूमाफियांचा हैदोस सुरु आहे. प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधल्यामुळे वाळूमाफियांचे आयतेच फावले आहे. संगमेश्वर तालुक्यातील करजुवे येथील वातवाडी आणि सुतारवाडी हे वाळूमाफियांचे अड्डे बनले आहेत. हे वाळूमाफियांचे अड्डे प्रशासन उद्ध्वस्त का करत नाही? की वाळूमाफियांना प्रशासनाचाच वरदहस्त आहे का? असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. या वाळूमाफियांमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.



गेल्या काही वर्षात संगमेश्वर तालुक्यात वाळूमाफियांनी आपले बस्तान बसवले आहे. करजुवे येथील वातवाडी आणि सुतारवाडीमध्ये चार ते पाच वाळूमाफिया दररोज बेसुमार वाळू उत्खनन करत आहेत. पुर्वी या परिसरात एक दोन माफिया वाळू उपसा करत होते. आता प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळूमाफियांची संख्या वाढली आहे. वाशूमाफियांची संख्या वाढत असताना प्रशासनाची कारवाई थंडावली आहे. संध्याकाळनंतर या वाळूमाफियांचे उद्योग सुरु होतात. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत वाळूची वाहतूक केली जाते. ही बेकायदेशीर वाळू वाहतूकही पोलिसांना सापडत नाही हा चिंतेचा विषय आहे.

## भाजप कार्यकर्त्यांचा शिरसाटांना विरोध

**। छ. संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

महायुतीत या आपूर्वीच मंत्रीपदांवरून अलबेल चालू होती. यातच आता जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून रस्सिखेच सुरू आहे. यावेळी, छ. संभाजीनगरच्या भाजप कार्यकर्ते म्हणत आहेत की, आमची ताकद अधिक असताना लोकसभेत शिंदे गटाला जागा दिली. काम करून खासदार निवडून आणला. विधानसभेतही अधिक जागा त्यांनाच. त्यावेळीही त्यांचे काम केले. आता पुन्हा पालकमंत्री त्यांचाच का? आता बस्स. आणखी किती सहन करायचे? अशा शब्दात त्यांनी



पालकमंत्रिपदाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या असून त्यांनी मंत्री शिरसाट यांच्या नावाला तीव्र विरोध करण्यात आला. त्यामुळे महायुतीत धुसफूस वाढली आहे.

महायुती सरकारने नुकतेच आपले मंत्री जाहीर केले आहेत. त्यांचे खाते वाटपही झाले आहे. यात शहरातून भाजपचे आमदार अतुल सावे, तर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांची मंत्रिपदी वर्णी लागली आहे. यानंतर आता छत्रपती संभाजीनगरचा पालकमंत्री कोण, यावरून शिंदे गट आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू आहे. आधी मंत्री शिरसाट यांनी जिल्ह्याचा पालकमंत्री मीच होणार असल्याचा दावा केला होता. यानंतर मंत्री सावे यांनीही आम्ही पालकमंत्रिपदासाठी मागणी केली असल्याचे सांगितले आहे. यावरून जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात महायुतीतच धूसफूस सुरू झाल्याचे दिसून येत आहे.


दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या उस्मानपुरा येथील कार्यालयात सोमवारी सदस्य नोंदणी प्रशिक्षण वर्ग पार पडला. समोर येऊन बोलण्यास नकार देणारे पदाधिकारी येथे मात्र चांगलेच बोलते झाले होते. येथे बोलताना पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्रिपदासाठी मंत्री शिरसाट यांच्या नावाला विरोध दर्शविला आहे. तर, दुसरीकडे मंत्री सावे हेच पालकमंत्री व्हावेत, अशी जाहीर भूमिका मांडली. एवढ्यावर न थांबता, एकमताने सावे पालकमंत्री व्हावेत, असा ठराव घेऊन मुख्यमंत्र्यांच्या भेटीला जाणार आहेत.

### संजय राऊतांचा महायुतीवर हल्लाबोल

# पाच वर्षांमध्ये माणुसकीचा खून

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**बीड आणि परभणीत घडलेल्या घटनांमुळे राज्यातील सामाजिक वातावरणासोबतच राजकीय वातावरण सुद्धा ढवळून निघाले आहे. या घटनांमुळे विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवलेला असताना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणावरून महायुती सरकारला खडेबोल सुनावले आहेत.**



संजय राऊत यांनी मंगळवारी (दि.२४)प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बीड आणि परभणीच्या घटनेवरून सरकारवर हल्लाबोल केला आहे. यावेळी ते म्हणाले की, हा महाराष्ट्र मानवतेसाठी, माणुसकीसाठी ओळखला जात होता. परंतु, गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यातील माणुसकीचा खून झाला आहे.

ते पुढे म्हणाले की, राहुल गांधी परभणीत गेल्याने बीड आणि परभणीतील घटना देशपातळीवर गेल्या आणि फडणवीसांची बेअब्रू झाली. एका आदर्श सरपंचाची ज्या प्रकारे हत्या झाली त्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनापासून खंत आणि खेद व्यक्त केला का? याबाबत आमच्या मनात संशय आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचीही हत्याच झाली आहे. हे राहुल गांधी बरोबर बोलले आहेत. या दोन्ही हत्यांची जबाबदारी मुख्यमंत्री म्हणून आणि गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी घ्यायलाच हवी. तुमचे मंत्री निर्लज्जांसारखे जात आहेत, तर ज्यांनी हत्या घडवल्या त्यांना पाठिशी घालत आहेत. मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष नेमले आहेत. पण ते या ठिकाणी येणार नाहीत कारण ते मोदींचे गुलाम आहेत, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

### फडणवीसांचे पित्त का खवळावे?

**काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सोमवारी परभणीच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी पभणीच्या हिंसाचारात पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना भेट दिली. परंतु, हा त्यांचा हा दौरा नौटंकी असल्याची टीका भाजपाच्या नेतेमंडळींनी केली. तसेच, त्यांच्या या भेटीवर राहुल गांधी हे राजकारण करत आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी टीका केली. त्यांच्या या टीकेला खा. संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधींच्या परभणी भेटीमुळे फडणवीसांचे पित्त का खवळले? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.**

## रत्नागिरीत सीएनजीची गळती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहरातील हिंदू कॉलनी येथे मोटारीमधील सीएनजीच्या टाकीतून गॅस गळती झाल्याने परिसरातील नागरिकांची भीतीने गाळण उडाली होती. पालिका आणि एमआयडीसीची अग्निशमन पथके तत्काळ दाखल झाली. त्यांनी टाकीच्या व्हॉल्व्हमधून होणारी गळतीची तीव्रता कमी करण्यासाठी त्यावर भिजलेले गोणपाट टाकले. गळती थांबविण्याचा दुसरा कोणताही उपाय नसल्याने परिसरामध्ये सर्वांना खबरदारीच्या सूचना करण्यात आल्या होत्या. यावेळी, ८ किलो सीएनजी हवेत सोडून देऊन टाकी रिकामी झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. दरम्यान, ही मोटरकार




सोसायटीबाहेर रस्त्याला लागून लावली होती. मोटारमालकांनी आठ किलो सीएनजी भरून टाकी फुल्ल केली होती. गाडी पार्क करून ठेवल्यानंतर काही वेळात गाडीतून गॅस गळती होत असल्याचा आवाज येत होता. काहींच्या ते लक्षात आल्यानंतर मालक नाचणकर यांना त्याची माहिती दिली. त्यांनी दबकत दबकत येऊन गाडीचे सर्व दरवाजे उघडे ठेवले. तेव्हा मोठ्याने गळतीचा आवाज येऊ लागला होता.

निवडक

## मोफत आरोग्य शिबीर

**रायगड :** जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी २६ डिसेंबर, २७ डिसेंबर आणि २८ डिसेंबर रोजी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असून सर्वांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक,डॉ. अंबादास देवमाने यांनी केले आहे. या शिबिरामध्ये आयुष-पंचकर्म, आयुर्वेद उपचार, समुपदेशन, आभाकार्ड-मोफत आभाकार्ड काढून दिले जाईल तसेच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यकतेनुसार रक्ताच्या चाचण्या मोफत केल्या जातील.

## वावंजेतून मुलीचे अपहरण

**पनवेल :** वावंजे येथून बारा वर्षीय मुलगी घराबाहेर गेली आणि ती घरी परत न आल्याने तिचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले. या प्रकरणी अनोळखी इसमा विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मुलगी दोन दिवसांपासून शाळेत गेली नसल्याने तिच्या वडिलांनी रागावले म्हणून ती रागाच्या भरात कॅन्टीनमधून खाऊ घेऊन येते असे सांगून बाहेर गेली आणि ती घरी परत न आल्याने तिचा इतरत्र शोध घेतला मात्र ती सापडून आली नाही.

## पनवेलमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** कविता जितेंद्र भगत ही महिला राहत्या घरातून कोणाला काही न सांगता पैसे आणि मोबाईल घेऊन निघून गेली. तिचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, मात्र ती सापडून आली नाही. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा वर्ण गोरा, बांधा सडपातळ असून उंची पाच फूट, दोन इंच आहे. अंगात लाल रंगाची सहावारी साडी, लाल रंगाचा ब्लाऊज घातला आहे. तिला हिंदी, मराठी भाषा बोलता येते.

## विवाहिता झाली बेपत्ता

**पनवेल :** अजिवली येथून एक विवाहिता महिला कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. वर्षा सार्डेकर असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, केस काळे, चेहरा गोल, नाक सरळ, उंची ५ फुट ५ इंच, पायात पैंजण व जोडवी घातलेली आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२४४४ किंवा पो.ना.नितीन डगळे यांच्याशी संपर्क साधावा.

## ग्राहक जागृती अभियान

**पनवेल :** २४ डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून शिवसेना पक्षाच्या ग्राहक संरक्षण कक्षातर्फे कामोठे रेल्वे स्थानक येथे ग्राहक जागृती अभियान राबविण्यात आले. शिवसेना नेते, सचिव व अध्यक्ष अनिल देसाई यांच्या आदेशानुसार ग्राहक जागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी ग्राहकांना त्यांचे हक्क या संदर्भात माहिती देण्यात आली. तसेच वाढत्या ऑनलाईन फसवणुकीला बळी पडू नये, ग्राहकांकरिता सुरक्षितता देणारा कायदा असावा, या संदर्भात माहिती देण्यात आली.

# समुद्रातील वाढती वर्दळ धोकादायक

### जलवाहतुकीत प्रवासी सुरक्षेचा प्रश्‍न ऐरणीवर

**। उरण । वार्ताहर ।**

अरबी समुद्रात झालेल्या प्रवासी बोट अपघातानंतर वर्षानुवर्ष सुरू असलेल्या जलमार्ग आणि प्रवासी सुरक्षा ऐरणीवर आली आहे. यात समुद्रातील वाढत्या वर्दळीमुळे हा जलमार्ग धोकादायक बनू लागला आहे. अपघाताच्या घटनेनंतर शासनाकडून प्रवासी सुरक्षेची दक्षता घेतली जात आहे. यात जलमार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लाईफ जॅकेटची सक्ती करण्यात आली आहे. परंतु प्रवासी बोटीत जॅकेट असले तरी ते न घालताच प्रवास केला जात असल्याची स्थिती आहे. प्रवासी बोटीना सुरक्षेसाठी करण्यात आलेली सक्ती ही कायम राहणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे.

अपघात झाला त्या मार्गावरून उरण, अलिबाग आणि नवी मुंबई येथील प्रवासी बोटी दररोज



प्रवास करीत आहेत. यातील सर्व जलवाहतूक ही वर्षभर सुरू असते. मात्र या घटनेनंतर पुन्हा एकदा या जलमार्गावरील सुरक्षा ऐरणीवर आली आहे. उरणच्या मोरा ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक पावसाळ्यातही सुरू असते. तसेच मुंबई ते अलिबाग दरम्यान जलसेवा आहे. मात्र चार महिने तुलनेने कमी प्रवासी या मार्गाने प्रवास करतात. त्याचप्रमाणे पावसाळ्यातील बदलत्या हवामानामुळे ही सेवा खंडित करावी लागते. अशा स्थितीत ही समुद्रातील लाटांचा सामना करीत ही सेवा सुरू असते. त्याचप्रमाणे बेलापूर ते मुंबई अशीही जलसेवा आहे. यात जेएनपीए बंदर ते गेटवे ऑफ इंडिया अशी जलसेवा आहे. या जलसेवेचा उपयोग बंदरातील कर्मचारी व कुटुंबिय, तसेच येथील खासगी बंदर आणि बंदरावर आधारित उद्योगातील कामगार करतात. मात्र पावसाळ्यात येणाऱ्या महाकाय लाटांमुळे गेटवे वरील सर्व प्रकारची जलसेवा बंद केली जाते. ही सेवा पावसाळ्यात खवलेला समुद्र शांत झाल्यानंतर पुन्हा पूर्ववत केला जातो. मात्र तो पर्यंत जेएनपीए बंदर मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गेट वे ऐवजी भाऊच्या धक्क्यापर्यंत प्रवास करता येतो.

उरण ते अलिबाग दरम्यानच्या करंजा रेवस मधील जलसेवा पावसाळ्यात सुरू असते. त्यामुळे अलिबाग ते मुंबई असा प्रवास करणारे प्रवासी हे करंजा रेवस मार्गाने प्रवास करीत आहेत. तर नौदलाच्या उरणच्या करंजा ते मुंबई या मार्गावरही प्रवासी वाहतूक केली जात आहे.

**महाकाय जहाजे**

**मोरा ते मुंबई आणि इतर मार्गाने ये जा करणाऱ्या मार्गावर जेएनपीए आणि मुंबई या दोन्ही प्रमुख बंदरातून ये जा करणारी महाकाय जहाजे ही प्रवास करीत आहेत. या दोन्ही बंदराचे चॅनल आहेत. प्रवासी बोटी प्रवास करीत असताना जर मालवाहू जहाज आले तर प्रवासी बोट थरथरते त्याचप्रमाणे बोट काही काळासाठी थांबवावी लागते. त्याचप्रमाणे इतर मालवाहतूक जहाजेही याच मार्गावरून येजा करीत आहेत. त्यामुळे प्रवासी बोटींना सुरक्षित मार्ग असावा अशी मागणी आता होऊ लागली आहे.**

> “ बोट अपघातानंतर प्रवासी सुरक्षेसाठी लाईफ जॅकेटची सक्ती करण्यात आली असून मोरा आणि एलिफंटा या दोन्ही मार्गावरील प्रवासी वाहतूक सुरळीत सुरू आहे.
> – नितीन कोळी,
> बंदर अधिकारी, मोरा ”

## देशी-विदेशी पक्षांचे खारघर खाडीत आगमन



**। पनवेल । वार्ताहर ।**

थंडीची चाहूल लागताच निसर्गाचे वरदान लाभलेल्या खारघर खाडीत देशी-विदेशी पक्ष्यांची रेलचेल पहावयास मिळत असून पक्षीप्रेमी पक्षी निरीक्षणाचा आनंद घेताना दिसत आहेत. खारघर, सेक्टर-८, १०, १६, १७ मधील वास्तुविहार तसेच रांजणपाडा आणि मुर्बी गावाच्या मागील बाजुस खाडी आहे. सध्याच्या घडीला या ठिकाणी विविध रंगी, आकर्षक पक्ष्यांचे थवे दिसू लागले आहेत.

रशिया आणि मध्य आशिया मधील स्थलांतरीत पक्ष्यांचे खारघरमध्ये मोठ्या संख्येने आगमन झाले आहे. आफ्रिका देशातील रोहित, सारस बगळे, रेड बुलबुल, बी इटर, गुलाबी स्टारलिंग, कॉमन किंगफिशर, पॅसिफिक गोल्डन किंगफिशर, लाजरी पाणकोंबडी, शराटी, शेकाटे, पाणकावळे, दुर्मिळ ब्लॅक टेलेड गॉडविटर्स, कर्ल्यू सँडपायपर्स या पक्षांचा समावेश असल्याने पक्षीप्रेमींमध्ये उत्साह संचारला आहे.

## राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन संपन्न

**। पनवेल । वार्ताहर ।**

राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग नवी मुंबई कडून वाशी येथे नागरिकांना ग्राहक हक्कांविषयी तसेच वस्तूंवरील वजन इ. माहिती बाबत प्रबोधन माहिती देऊन जनजागृती उद्देशाने आयोजन वैधमापन शास्त्र यंत्रणा वाशी नवी मुंबई विभागमार्फत करण्यात आले होते.

विक्रीसाठी असणाऱ्या वस्तूंच्या आवरणावर एम आरपी, वजन, उत्पादनाची तारीख,पॅकेर्सवर पूर्ण पत्ता ,ग्राहक, ई - मेल, दूरध्वनी क्रमांक इ. प्रिंट



करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र नागरिक ह्या सूचना तपासून घेत नसल्याने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते. शासनाच्या वैधमापन शास्त्र विभाग अशा व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवते. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकाटे, वस्तू उत्पादनांवरील आवश्यक माहिती बद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली.

## नैसर्गिक साधन संपत्तीतूनच शेतकऱ्यांचे स्थैर्य उंचावेल

### शेतकरी संवादातून डॉ. प्रसाद देवधरांनी दिला विश्‍वास

**। माणगाव । वार्ताहर ।**

शेतकऱ्यांनी आर्थिक स्थैर्य वाढविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीकडे पाहण्याची आणि सोबतच उपजीविका उपक्रमांबद्दल असलेली कृतीशील धोरणांची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर शाश्वत ग्रामीण आनंदमयी ग्रामीण जीवन अशी कल्पना विरळ होत असतानाही सुयोग्य सामूहिक प्रयत्नांतून बऱ्याच गोष्टी शक्य आहेत. मात्र कांही जणांनी एकत्र येवून पुढाकार घेण्याची गरज आहे. असा विश्वास भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रसाद देवधर यांनी विळे- भागाड औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आयोजित केलेल्या चौथ्या त्रैमासिक माध्यम संवाद आणि शेतकरी मार्गदर्शन सत्रात बोलताना व्यक्त केला.

पोस्को कंपनीमध्ये दिनांक २० डिसेंबर रोजी वर्षभरातील चौथ्या त्रैमासिक माध्यम संवाद आणि शेतकरी मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते. हे एकूण १५ वे सत्रदेखील होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. पोस्कोचे उपव्यवस्थापकीय संचालक ईन क्यो बे यांनी त्यांच्या भाषणात पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या कल्याणकरी उपक्रम आणि आसपासच्या विकासासाठी



दृढ वचनबद्धतेची पुष्टी केली. वक्ते म्हणून भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रसाद देवधर यांना निमंत्रित केले होते.

भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान मार्फत ९,००० हून अधिक बायोगॅस बांधले आहेत, ३५० कुक्कुटपालक शेतकरी, ३०० एकरावर सिंचन सुविधा, बचत गट व अनेकांना रोजगार उपलब्धी, युवक कल्याण, बालविकास व महिला सक्षमीकरणाचे कार्य, अंड्याचे गाव वाडोस येथे समूह शेतकरी विकासातून दरमहा १ लाख अंडी तयार होतात, २० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रकल्पामाध्ये सहाय्यकारी संस्था म्हणून काम केले. असे अनेक उपक्रम सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबवले जातात. डॉ. देवधर यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले.

शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीकडे पाहण्याची आणि सोबतच उपजीविका उपक्रमांबद्दल असलेली कृतीशील धोरणे फारच महत्वाची वाटली. शाश्वत ग्रामीण आनंदमयी ग्रामीण जीवन अशी कल्पना विरळ होत असतानाही सुयोग्य सामूहिक प्रयत्नांतून बऱ्याच गोष्टी शक्य आहेत मात्र काही जणांनी एकत्र येवून पुढाकार घेण्याची गरज असते. आपण सगळ्यांनी वेळात वेळ काढून भगीरथला या असा आग्रहही डॉ. देवधर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला २० पत्रकार आणि ५१ शेतकऱ्यांसह एकूण ७१ उपस्थितांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसला.

## जीवनाचे शिल्पकार बना- नितीन पाटील

**। कर्जत । वार्ताहर ।**

जीवनातील प्रत्येक गोष्टींबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास आपण निश्‍चितच यशाची उत्तुंग भरारी घ्याल. तुम्हाला तुमच्या यशाचा मार्ग तुम्हालाच निर्माण करायचा आहे. त्याकरिता मोठा विचार करा आणि तुम्ही विचार सक्षम, सकारात्मक व सकारात्मक कृती करून त्यात सातत्य ठेवल्यास सकारात्मक व तुम्हाला इच्छित परिणाम मिळतील, असा सल्ला उत्तुंग भरारीचे प्रेरणादायी वक्ते नितीन पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने फार्मसी डिप्लोमा, फार्मसी डिग्री आणि एम फार्म या विभागाच्या पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रेरणादायी वक्ते नितीन पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे सचिव प्रदीपचंद्र शृंगारपुरे, महाविद्यालयीन समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. अमोल चांदेकर, डॉ. निलोफर खान, पालक प्रतिनिधी सुधीर चव्हाण, विभावरी इंगळे आदी उपस्थित होते.

## व्यावसायिक प्रशिक्षण शिबीर संपन्न

**नवीन पनवेल :** वीर वाजेकर महाविद्यालय महालन विभाग फुंडे येथे राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थेच्या माध्यमातून १२० विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थान या भारत सरकारच्या संस्थेच्या माध्यमातून देण्यात आले. मार्गदर्शक सुषमा दास यांनी प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांना गुंतूवणूक, म्युच्युअल फंड, शेअर खरेदी - विक्री, डी - मॅट खाते व याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतूवणूक यांचे महत्व पटवून दिले.महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी भविष्यात या क्षेत्रात नोकरी व स्वयंरोजगाराच्या प्रचंड संधी आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे कोर्सेस करणे व पुढील परीक्षा देणे आवश्यक आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या १२० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## एमआयडीसीकडून उरणमध्ये दोन दिवसांची पाणीकपात

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रानसई धरणातून उरण शहर आणि येथील ग्रामपंचायतीना केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्यात कपात करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आठवड्यातील मंगळवार आणि शुक्रवार असे दोन दिवस कपात करण्यात येणार असल्याची माहिती एमआयडीसीने दिली आहे.

उरणच्या रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता कमी असल्याने पावसाळ्यातील साडेतीन महिन्याचे लाखो लीटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे येथील नागरिकांना डिसेंबर महिन्यापासूनच वर्षोनुवर्षे पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेकवर्षे धूळखात बसला आहे. ही स्थिती बदलून उरणला पाणीदार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून उरणकराना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र एमआयडीसीकडे केवळ ३० दश लक्ष लिटर पाणीच असल्याने दररोज १० दश लक्ष लिटर पाणी कमी पडत असल्याने हा पाणी पुरवठा जून महिन्यापर्यंत पाणी पुरवठा करता यावा यासाठी पाणीकपात केली जात आहे.

दरम्यान, एमआयडीसीकडून पाणीपुरवठा करता यावा साठी सिडकोकडून पाणी घेतले जाते. त्या बदल्यात एमआयडीसीकडून सिडकोला पाणी दिले जाते यात सिडकोकडून ३.८ दशलक्ष लीटर पाणी घेतले जात आहे. रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढवावी किंवा धरणातील गाळ काढावा या दोन उपाययोजनाची चर्चा २५ वर्षांपासून होत आहे.

> “ **रानसई धरणातील पाणी उन्हाळ्यात आणि जूनपर्यंत पुरवठा करता यावा या करिता यांचे नियोजन म्हणून मंगळवारची पाणीकपात सुरू करण्यात आली आहे. शुक्रवारी आठवड्यातील नेहमीची कपात आहे. याची सूचना ग्रामपंचायतीना देण्यात आली आहे. – जी. एन. सोनवणे, उपअभियंता, एमआयडीसी, उरण** ”

## मारूती कोलाटकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली येथील रहिवासी असणारे रायगड भूषण गुरूवर्य मारूती कोलाटकर यांना विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान या राष्ट्रीय सन्मानाने सन्मानित करण्यात आले आहे.

पं.दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ मथुरा यांच्या वतीने इंदौर येथे ता.२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. रामगड भूषण मारूती महाराज कोलाटकर यांनी धार्मिक तथा अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ मथुरा या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.



**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे** N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत रु.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून** ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत रु .१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- **नागावमधील हॉटेलमध्ये** काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **अलिबागमधील ब्युटी पार्लर** कामासाठी अनुभवी मुलगी पाहीजेत. ८१४९८६५६२५
- **अलिबाग आणि परिसरातील** Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- **अलिबाग येथे मोक्याच्या ठिकाणी** EDII नॅशनल इन्स्टिट्यूट कार्यालयाकरीता जागा भाड्याने पाहिजे. संपर्क : शशिकांत दनोरीकर ७७७५८०२४९७
- **रिसोर्टमध्ये काम करण्यास** मुलगा हवा आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण सासवणे.
- **रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं** हव आहे. संपर्क- ९६०७१०२३५७ ठिकाण सासवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### लांब पल्ल्याच्या गाड्या थांबेनात, कोलाड, विर लोकल सुरु करण्याची मागणी

# स्थानकांचे सुशोभिकरण उपयोगशून्य

**। कोलाड । वार्ताहर ।**

सार्वजनिक बांधकाम विभागा तर्फे रायगड जिल्ह्यातील कोलाड व विर रेल्वे स्थानकाचे सुशोभिकरण करण्यात आले. त्याचे उद्घाटन माजी बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. परंतु याच कोलाड स्थानकात फक्त दादर रत्नागिरी एकच पॅसेंजर गाडी थांबते तर दुसरी गाडी दिवा सावंतवाडी कोरोना काळापासून बंद करण्यात आली आहे. ती अद्याप सुरु न झाल्यामुळे या परिसरातील सर्वसामान्य जनतेचे हाल होताना दिसत आहे. मग हे सुशोभिकरण



कोणाच्या कामाचे? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत असुन कोलाड ते विर पर्यंत लोकल सुरु करण्याची मागणी केली जात आहे.

कोकणात रेल्वे सुरु करण्यासाठी मधु दंडवते रेल्वे मंत्री असतांना कोकण रेल्वेचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी ई.श्रीधरन यांना कोकण महामंडळाचे अध्यक्ष नेमून त्यांच्या नेतृत्वाखाली कोकण रेल्वेच्या महामार्गाचे काम सुरु झाले यानंतर १९८९ ते १९९०मध्ये रेल्वे मंत्री जॉज फर्नांडीस यांनी कोकण रेल्वे प्रकल्पाला चालना दिली.

कोकणचा विकास व्हावा यासाठी पिढ्यान पिढ्या कसत असलेल्या जमिनी शेतकऱ्यांनी कोकण रेल्वेसाठी दिल्या कोकण रेल्वे ही सुरु झाली. परंतु जेथे कोकण रेल्वे सुरु झाली. त्या पहिल्याच स्टेशनला रो रो सेवा सुरु झाली व धनदांडग्यांचा प्रश्न सुटला परंतु सर्वसामान्य प्रवाशांसाठी एकच गाडी थांबत असल्यामुळे प्रवाशी वर्गाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

कोलाड हे व्हाईट वॉटर राप्टिंगसाठी प्रसिद्ध ठिकाण असुन बाजूला कुंडलिका नदी, हिरवेगार निसर्ग, धबधबे सह्याद्रीची नयनरम्य पार्श्वभूमी यासाठी ओळखले जाणारे कोलाड तसेच कोलाड परिसरातील गोवे येथे असणारे तटकरे पॉलिटेक्निकल असल्यामुळे येथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येत असतात याच कॉलेजच्या बाजुने कोकण रेल्वे गेली आहे. परंतु येथे कोणतेही लोकल सेवा सुरु नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

कोलाड परिसरात ७१ गावांचा समावेश होतो. येथून मुंबई जवळ असल्यामुळे पनवेल कोलाड ते वीरपर्यंत लोकल सेवा सुरु झाली तर उद्योगधंद्याना चालना मिळेल. गृहिणी तसेच विद्यार्थी यांना पार्टटाईम नोकरी ही करता येईल. कोलाडपासून पुणे हे नजिकचे ठिकाण असून पुणे मार्गाकडे जाणाऱ्या लोकांचा ही फायदा होईल. सर्व बाबींचा विचार करता पर्यटनाला चालना व तरुणांना रोजगार ही मिळेल. यामुळे तीनवेळा पनवेल कोलाड ते वीरपर्यंत लोकल रेल्वे सुरु करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## कळंब मराठी शाळेचे यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका शिक्षण विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तालुक्या स्तरीय व्यक्तिमत्व



विकास स्पर्धेत कळंब शालेच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूह गानमध्ये लहान गटात दुसरा आणि मोठ्या गटात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

रायगड जिल्हा परिषद सेस फंडातून जिल्ह्यात तालुका स्तरावर विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या तालुका स्तरीय स्पर्धा कर्जत शहरातील महिला मंडळाच्या विद्या विकास मंदिर शाळेत रंगल्या होत्या. या स्पर्धेत तालुक्यातील २७ केंद्रांमध्ये आणि नंतर ६ बिट पातळीवरून झालेल्या स्पर्धेतील पहिल्या ३ क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग देण्यात आला होता. स्पर्धेत कळंब मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत गायन स्पर्धेतील लहान गटांमध्ये द्वितीय क्रमांक आणि मोठ्या गटामध्ये तृतीय क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

### विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन

# नागांवच्या पीएनपी शाळेत रंगल्या स्पर्धा








**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील नागाव येथील पीएनपी सायरस पुनावाला सीबीएसई शाळेमध्ये सोमवारी (दि.२३) सायंकाळी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. धावणे, पोहणे, फुटबॉल अशा अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन खेळाचा आनंद लुटला.**

सुरुवातीला पोहण्याची स्पर्धा शाळेच्या अद्ययावत अशा स्विमिंग पूलमध्ये घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. त्यानंतर फुटबॉल, चमचा गोटी, धावणे आदी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये यश संपादन करणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकांच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच, ५० मीटर धावणे मुलांच्या गटात आरुश याने प्रथम क्रमांक पटकाविला असून श्रीनिवास बनकर याने द्वितीय व स्वरुप घाडगे याने तृतीय क्रमांक मिळविला आहे. तर, ५० मीटर धावणे मुलींच्या गटात समंथा नायडू हीने प्रथम, प्रिशा राऊत द्वितीय व नाव्या गुप्ता हीने तृतीय क्रमांक मिळविला आहे.

बॉल ईन बकेट स्पर्धेत नाव्या गुप्ता हीने प्रथम, समंथा नायडू हीने द्वितीय तर क्रिस्टिना मेलिट हीने तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच, पोहण्याच्या स्पर्धा विविध गटात पार पडल्या. त्यामध्ये पहिल्या गटात (मुली) प्रिशा राऊळ हीने प्रथम, समंथा नायडू हीने द्वीतीय व नाव्या गुप्ता हीने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

मुलांच्या गटात अंश निखिल मयेकर याने प्रथम, शुभ अनंत सिंग याने द्वितीय, तर वंश केतन पाटील याने तृतीय क्रमांक मिळविला आहे. पोहण्याच्या दुसऱ्या गटात मुलींमध्ये विश्वा कांबळी, त्विशा प्रधान काश्वी बुरांडे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. मुलांमध्ये अर्णव मगर, अथर्व घरत, श्रीमत म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

पोहण्याच्या तिसऱ्या गटात मुलींमध्ये आर्या भोईर याने प्रथम, काव्या भगत हीने द्वितीय क्रमांक मिळविला. मुलांमध्ये रुद्र नाखवा याने प्रथम, आर्यन पाटील याने द्वितीय, शंतनू कवळे याने तृतीय क्रमांक मिळविला. फुटबॉल, बास्केट बॉल व लंगडी स्पर्धेत ही यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन






सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टींग चॅम्पीयन तथा तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, आंतरराष्ट्रीय धावपट्टू तथा मुंबईच्या महिला पोलीस व पीएनपी कॉलेजच्या माजी विद्यार्थिनी सोनिया मोकल, माजी सरपंच नंदकूमार मयेकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, सरपंच हर्षदा मयेकर, मुख्याध्यापिका गितीका भूचर, उपमुख्याध्यापिका बर्टीना मेलीट, क्रीडा प्रशिक्षक राकेश म्हात्रे, संस्थेचे मुख्य कार्यालयाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. या स्पर्धा पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालक वर्ग, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविद्यालयाच्या क्रीडा स्पर्धा संपन्न

**। तळा । प्रतिनिधी ।**

द.ग. तटकरे महाविद्यालयात २० व २१ डिसेंबर रोजी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्‌घाटन तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी कबड्डी, क्रिकेट, रनिंग १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, गोळा फेक, थाळी फेक, कॅरम, बुद्धिबळ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. शुक्रवारी (दि.२०) झालेल्या मुले आणि मुलींच्या कबड्डी स्पर्धेत बी.कॉम वर्गाचा संघ विजयी झाला आहे. तर, मुले आणि मुलींच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये बी.ए. वर्गाचा संघ विजयी झाला आहे. तसेच, शनिवारी (दि.२१) वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. सुयोग्य नियोजनामुळे यशस्वीरीत्या या स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.

यावेळी संस्थेचे सदस्य महादेव बैकर, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. भरत चाळके, प्रा. विजय चव्हाण, इतर प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कासारवाडी शाळेची दमदार कामगिरी

**। पाली । वार्ताहर ।**

रा.जि.प. सेस फंड अंतर्गत सुधागड तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा दि.१९ व २० डिसेंबर या कालावधीत पार पडल्या. या स्पर्धेत पेडली केंद्रातील आसरे कासारवाडी शाळेने दमदार कामगिरी करीत पारंपरिक नृत्य स्पर्धेत तालुक्यात मोठ्या गटात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, आसरे कासारवाडी शाळेला जिल्हास्तरापर्यंत जाण्याची संधी प्राप्त झाली आहे. तसेच, लंगडी या स्पर्धेत मुलींनी तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



## बालयुवक पेझारी अंतिम विजेता

**। श्रीगांव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे प्रगती क्रिडा मंडळ आयोजित पोयनाड-शहाबाज क्रिकेट असो.च्या मान्यतेने रविवारी (दि.२२) ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या बालयुवक पेझारीला १५ हजार रू. व द्वितीय क्रमांक पटकावलेल्या जय बजरंग घसवडला १० हजार रू. देण्यात आले. तर, तृतिय क्रमांक पटकावलेल्या जय गणेश आंबेवाडी व चतुर्थ क्रमांक पटकावलेल्या प्रगती श्रीगाव या संघाला प्रत्येकी ६ हजार रू. देण्यात आले आहेत. तसेच, सर्व



विजेत्या संघाना आकर्षक चषक देण्यात आले आहेत.

तसेच, स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज प्रतीक (जय गणेश आंबेवाडी), उत्कृष्ट गोलंदाज प्रतीक पाटील (प्रगती श्रीगाव), सामनावीर निकेश पाटील (बालयुक पेझारी), मालिकावीर अपंत्य (जय बजरंग घसवड) यांचा विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेचे उत्कृष्ट समालोचन निलेश पाटील यानी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रगती क्रिडा मंडळाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम केले.

## बुद्धिबळ प्रशिक्षक शिबिराचे आयोजन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्यावतीने 'शाळेत बुद्धिबळ' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन १२ जानेवारी रोजी अलिबाग येथे करण्यात आले आहे.

हे शिबीर एक दिवसाचे असून शाळेसाठी बुद्धिबळ प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने बुद्धिबळातील शालेय अभ्यासक्रम, तांत्रिक कौशल्ये, इंटरनेट व वेबसाईट सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बुद्धिबळासाठी करण्यासंबंधीत सर्व प्रकारची माहिती देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील १८ वर्षापुढील बुद्धिबळाची आवड असणारे विद्यार्थी, खेळाडू, प्रशिक्षक, पालक तसेच क्रीडा शिक्षक या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेऊ शकतात.



अधिक माहितीसाठी विलास म्हात्रे (८८८८०११४११), संदिप पाटील (९९२०३५१५८३), सी.एन.पाटील (९३२६५०४१७९) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष, महाराष्ट्रचे खजिनदार आणि चेस इन स्कुलचे सेक्रेटरी विलास म्हात्रे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तारांगण उपक्रम

**। म्हसळा । वार्ताहर ।**

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसळा या विद्यालयात विद्यार्थ्यांच्यासर्वांगीणविकासासाठी विविध उपक्रम राबवीत असतात. यामध्ये आजचे युग हे विज्ञानाचे आहे आणि या विज्ञानातील काही गोष्टींची अभ्यास अधिक सुलभतेने व्हावे यासाठी विद्यालयांमध्ये अंजेनिया तारांगण केंद्रामार्फत तारांगण या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना अंतराळातील काही



घटना, लाव्हारस, चांद्रयान-३ हे यशस्वी उतरले कसे?, सूर्यमालेतील ग्रहांची माहिती इत्यादी माहिती दाखविण्यात आली.

यावेळी या तारांगण संस्थेचे प्रमुख सुरेश जाधव व अमित जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टीची माहिती दिली. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला श्रीडी व्हिडिओच्या माध्यमातून माहिती मिळाली व विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. यावेळी प्राचार्य डी.आर.पाटील यांनी विद्यार्थ्यांना तारांगण पाहण्यासाठी प्रोत्साहीत करून सहभागी होण्यास सांगितले. यावेळी माध्यमिक विभाग पर्यवेक्षक जे.के. मांजरेकर, ई.सी. पाटील, जमदाडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### टी-२० विश्वचषकासाठी मुलींचा संघ जाहीर

# तीन 'मराठी' खेळाडूंना मिळाली संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गतविजेता भारतीय संघ पुन्हा एकदा १९ वर्षांखालील मुलींचा टी-२० विश्वचषक उंचावण्यासाठी सज्ज झाला आहे. बीसीसीआयच्या महिला निवड समितीने पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेसाठीचा संघ जाहीर केला आहे. १८ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा मलेशियात खेळवली जाणार आहे. भारताच्या या संघात सानिका चाळके (उपकर्णधार),







भाविका अहिरे (यष्टिरक्षक) व इश्वरी अवसारे या तीन मराठी मुलींचा समावेश आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या १६ संघांची प्रत्येकी ४ अशा चार गटांत विभागणी केली गेली आहे. गतविजेत्या भारतीय संघाला 'अ' गटात स्थान दिले गेले आहे आणि त्यांच्यामसोर मलेशिया, वेस्ट इंडिज व श्रीलंका यांचे आव्हान असणार आहे. क्वालालम्पूर येथील बायुमास ओव्हल येथे भारताच्या साखळी फेरीच्या लढती पार पडणार असून भारतीय संघाचा पहिला सामना १९ जानेवारीला वेस्ट इंडिजविरुद्ध होणार आहे.

चार गटांमधून प्रत्येकी ३ संघ हे अंतिम सहासाठी पात्र ठरतील. १२ संघांची पुन्हा दोन गटांत विभागणी करण्यात येईल. पहिल्या गटात 'अ' व 'ड' गटातील अव्वल तीन संघांचा समावेश असेल, तर दुसऱ्या गटात 'ब' व 'क' गटातील अव्वल तीन संघांचा समावेश असेल. अंतिम सहामध्ये प्रत्येक विजय, गुण व नेट रन रेट महत्त्वाचा ठरणार आहे. या गटात प्रत्येक संघ २ सामने खेळतील आणि त्यानंतर दोन्ही गटातील अव्वल २ संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. उपांत्य फेरीचे सामने ३१ जानेवारीला होतील, तर अंतिम सामना २ फेब्रुवारीला होईल.

**भारतीय संघ**

**निकी प्रसाद (कर्णधार), सानिका चाळके (उप कर्णधार), जी त्रिशा, कमालिनी जी (यष्टिरक्षक), भाविका अहिरे, इश्वरी अवसारे, मिथिला विनोद, जोशिथा व्हीजे, सोनम यादव, परुणिका सिसोदिया, केसरी दृथी, आयुषी शुक्ला, आनंदिता किशोर, एमडी शबनम, वैष्णवी एस. राखीव: नंदना एस, इरा जे, आनंदी टी.**

## श्रावणी केणीची चमकदार कामगिरी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील श्रावणी किरण केणी हिने शनिवारी (दि.२१) अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीयस क्रॉस कंट्री स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. ती या स्पर्धेत प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली असून तिची निवड अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. तिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.



दरम्यान, यावर्षी झालेल्या सीबीएससी बोर्डाच्या चॅम्पियन शिपमध्येही श्रावणी केणी हिने महाराष्ट्र आणि गोवा विभागात ४०० आणि ८०० मीटर अशा दोन्ही स्पर्धेत सुयश प्राप्त करून प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. तर, वाराणसी येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत ४०० व ८०० मीटर या दोन्ही स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करून, देशात तिने पाचव्या क्रमांकाने येण्याचा बहुमान मिळविला आहे. याआधी पनवेल मॅरेथॉन, फुंडे मॅरेथॉन, खारघर मॅरेथॉन, नेरळ मॅरेथॉन येथील स्पर्धेत सहभाग नोंदवून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)